इ. १०४    सन. १८८७

# रघुनाथ यादवकृत पानिपतची बखर

( श्री प्रिंटर्स अ‍ॅण्ड स्टेशनर्स  ठाणे )

. ग्रं. सं. ठाणें
इतिहास
९२५
१८८८

[redacted] रचित

# पाणिपतची बखर

ही;

किताबखान्याचे व्यवस्थापक

आणि

ग्रंथवर्धक छापखान्याचे मालक

यांनी,

पुणें येथें

"श्री शिवाजी" छापखान्यांत
छापून प्रसिद्ध केली.

सन १८८७ इसवी.

किंमत सहा आणे.

५ ९

रघुनाथ यादवकृत

# पानिपतची बखर.

१२०

॥ श्रीगणपति प्रसन्न ॥

श्रीमंत महाराज मातोश्री गोपिकाबाई साहेब. मुक्काम शहर पुणे साहेबांचे सेवेशी.

आज्ञाधारक रघुनाथ यादव लेखक दिम्मत चिटणीस कृतानेक साष्टांग दंडवत. विज्ञापना तागाइत छ २९ जमादिलाखर पावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष: नवी खबर श्रीमंत यांजकडून वर्तमान आजपर्यंत झालें तें विदित व्हावें ह्मणून आज्ञाधारकास आज्ञा जहाली. त्यास यथामतीनें निवेदन करितों. श्रवण केलें पाहिजे.

यथापूर्व कथन. श्रीमंत महाराज राजश्री शाहू महाराज छत्रपति यांणीं निजधामास जातेसमयीं राजश्री नानासाहेबांस व भाऊसाहेबांस सातारियाचे मुक्कामीं ...नक बोलावून आणून, सर्व निरवानिरव करून, शिक्केकटार हवालीं करून, मस्तकीं वरदहस्त ठेविला. आणि आज्ञा जहाली जे " माझे मागें सकल पृथ्वीचें राज्य करणें. तुह्माशिवाय राज्यास धणी कोणी दिसत नाहीं. " असें सांगून महाराज कैलासभुवनास गेले. ...गें राजश्री नानासाहेब व भाऊसाहेब यांणीं आपल्या ...क्रमानें अटकेपर्यंत मुलुख काबीज केला. बारा वर्षे

सकळ पृथ्वीचें राज्य केलें. राज्याचा उदय दिवसेंदिवस होत चालला. सर्व जग प्रांतांतील किल्ले कोट व महादुर्ग सोडविलीं. एक सत्तेनें मांडलिक राजे सेवक होऊन दास्यत्व करूं लागले. असा पराक्रम थोर सर्वाविशेष जाहला, असतां त्यास पुढें होणारें भविष्य बळवंत याजकरितां राजश्री नानासाहेबांस बुद्धि जहाली जे, राजश्री भाऊसाहेबांस हिंदुस्थानांत फौज देऊन रवाना करावें. तेसमयीं राजश्री महादाजीपंत पुरंधरे यांहीं श्रीमंत महाराज यांस विनंति केली कीं, "भाऊसाहेबांस एकंदर हिंदुस्थानचे मोहिमेस पाठवूं नये. भाऊसाहेबांचे कारभाराचा हावभाव दुसरे कोणास येणार नाहीं. सर्व राज्याचा भार त्यांजवर आहे." असें कित्येक प्रकारें सांगितलें. तेसमयीं श्रीमंत राजश्री नानासाहेब यांणीं उत्तर केलें कीं, "भाऊसाहेबांचे चित्तांत स्वारीस जाण्याचें आहे याजकरितां त्यांस पाठवितों. त्यांचाही मानस फार दिवस आहे. याजकरितां येविशीं स्वारी करून आले म्हणजे सर्वांची खातरजमा होईल." तेव्हां महादाजीपंत पुरंधरे यांणीं उत्तर केलें कीं, "कैलासवासी चिमाजीआपा[1] यांणीं पूर्वी बहुत पराक्रम केला, त्यांचे चिरंजीव भाऊसाहेब हे लढाईस मागें हटणार नाहींत. शत्रूस पराभवितील किंवा आपण कैलासवासी होतील. त्यांत सहसा अन्यथा नाहीं. याजकरितां त्यांस सहसा पाठवूं नये." ते समयीं सौभाग्यवती गोपिकाबाई साहेब यांणीं अनुमोदन दिलें

---

१ वसईचा किल्ला फिरंग्या पासून घेण्याचे कामांत चिमाजी अप्पांनीं केवढा पराक्रम केला हें इतिहासज्ञांस विश्रुत आहेच.

कीं, त्यांस रवाना केलें पाहिजे. सबब दृढ निश्चय करून, मागील पराक्रम मनांत आणून, पुढेही रूमशाम येथें स्वराज्य करणें हीच उमेद भाऊसाहेबांचेही मनांत आहे, दुसरा निजध्यास नाहीं; इराणीही अटकेपार[२] होता तो अटक नदी उतरून अलीकडे आला, त्यास अटकेपार घालवावा. या कारणास्तव राजश्री सदाशिवपंतभाऊ व चिरंजीव विश्वासराव साहेब यांची रवानगी केली पाहिजे, अशी मसलत करून समागमें प्रमुख सरदार नामांकित देऊन हिंदुस्थानप्रांतीं रवानगी केली. त्यांची नांवनिसी वितपसील असामी:—

| | |
|---|---|
| १ मल्हारजी होळकर. | १ रामराव खंडोजी देवकांते. |
| १ जनकोजी शिंदे. | १ सिधोजी कामरे. |
| १ दमाजी गायकवाड. | १ सयाजी ठानगे. |
| १ यशवंतराव पवार. | १ गोपाळराव. |
| १ समशेर बहादर. | १ गोविंदपंत बुंदेले. |
| १ त्रिंबकराव सदाशिव. | १ सुलतानराव. |
| १ नाना पुरंधरे. | १ हणमंतराव सोनवणकर. |
| १ सोनाजी भापकर. | १ रघुनाथजीबावा. |
| १ विठ्ठल शिवदेव. | १ बहिरजी शेडगे. |
| १ उमाजी माहारणे. | १ गोविंदपंत. |
| १ तुकोजी पवार. | १ अप्पाजी जाधवराव. |
| १ नारायणराव मोहिते. | १ संताजी आटोळे. |
| १ बळवंतराव गणपत. | १ देवजी शिवनेरे. |
| १ आनंदराव पवार. | १ शामराव गणेश. |
| १ नरसिंगराव बांडे. | १ लिंगोजी नारायण. |

२. अटक म्हणजे सिंधुनदी. ही हिंदुस्थानची अटकच होय.

१ बळवंतराव विनायक.
१ बाजे लोक.
१७

१ मानसिंगराव बांडे.
१ विसाजी महारुद्र.
१ हुजरात.
१८

३५

सदहूप्रमाणें नामांकित बरोबर सरदार व याखेरीज चाळीस हजार धारकरी शिवाय सरदार, याप्रमाणें फौजेचा जमाव करून रवानगी केली. गंगापार होतांच नबाबांनीं कटकट काढली. त्याचें पारिपत्य करून चवसष्ट लक्षांचा मुलूख सोडवून पुढें नर्मदेपार गेले. तों फौजेचा तळ उज्जनीपावेतों पडत चालला. त्या प्रांतींचे जे जे सरदार व अप्पाजीराव व अंताजी माणकेश्वर वगैरे पतके होते ते येऊन भेटले. संपत्ति, दारा, मित्र, मर्वांकरून अनुकूळ जहाले. वरचेवर आला स्वार घोडाराउत, ठेवीत चालले. क्षिप्रापार होऊन मजल दरमजल पुढें चालले. हजिरी गणतीस एकंदर लहान थोर सरदार मिळून साडेतीन लक्ष घोडेराऊत जमले. याखेरीज पायदळ साठहजार. ऐसा एकंदर जमाव जाट व मराठे आदिकरून सव्वाचार लक्ष फौज गणतीस लागली. राजश्री मल्हारराव होळकर यांचा तोफखाना जरबा सुमारें ३०० तीनशें व सरकारी तोफखाना बरोबरचा सुमारें ४००. याखेरीज उज्जनींतील व पायगडांतील व झांसींतील व नरवरांतील मिळोन सुमारें ५०० पांचशें. ऐसा तोफखाना जरबा सुमारें १२०० बाराशें. याखेरीज जेजाला व सुतर-

ठाणे

नाला मिळून आवाज दोनहजार व बाणांच्या कैच्या सुमारें ४०,००० चाळीसहजार शिवाय दारूगोळा. पुरें सामान शिलेपोस करून शेहाण्णव कुळींचे मराठे जमा करून, अंगीं ज्यांच्या मर्दुमी, समशेरबहादुर रणपंडित, याजप्रमाणें फौजेचा बंदोबस्त करून दिल्लीचे सुमारें सदाशिवपंत परम आनंदेकरून हर्षभरित चालले. अंतरवेदीपासून तहत बंगाला आदिकरून बादशाहीगिरीचा पेशजीचा खालीसा अंमल मुलुख मारून दक्षण राज्य केलें. इतुक्या लष्करास खर्चास व दाणावैरणीस कांहीं मुलुखांत बाकी राहिली नाहीं. सात आठ गांवची जागा मुक्कामास पाहिजे. सेनासागर दिवसेंदिवस अधिक उचंबळत चालला. पुढें जाट आदिकरून जे जे भुमे त्या प्रांतींचे होते तितके अनुकूल जहाले. चोहोंकडील फौजा मिळून यमुनातटाकास सदाशिवपंत भाऊ दाखल जहाले.

बुंदेलखंड व बंगाला येथील रजपूत यांनीं व मांडलिक राजे यांणीं आपआपले सरदेशीं फौजा घेऊन येऊन दोहींकडे अंग न देतां सलुख राखून, मित्रत्व संपादून आपआपले स्वस्थलास स्वस्थ राहिले. इराणीस किंवा सदाशिवपंतासही सामील जहाले नाहींत. तसे अंतरवेदीकर जयसिंग यांणीं आपली फौज दोघांसही कुमकेस न देतां आपल्या स्वस्थानावर होते. हस्तनापूरवासी पातशहा यांणीं बदनजर धरून, इराणी, व आपण एकत्र होऊन, दक्षणी फौजेचा उपमर्द करावयाचा विचार आरंभून, मनसूर अल्ली व महमदखान व मोतीभुजसिंग राजे अयोध्येचे यांणीं व सुजातदौले या

सर्वांनीं कमाते करून इराणी आणावयाचा संकेत केला.

हा मजकूर तपशीलवार सदाशिवपंतांस कळला. तेव्हां, सदाशिवपंतांनीं सुजातदौला याजकडे मातबर माणूस वकिलीस पाठवून बोलणें घातलें कीं, "मागें अवदल्ली इराणी बेइमानी होऊन बादशाहीचा न्हास केला दिल्लीपद बादशाहींत बाकी राहिलें नाहीं, व तुह्मी व मनसूरअल्ली मिळोन इराणीस घेऊन येतां ही गोष्ट अनुचित, यांत कांहीं ताजकी होतां दिसत नाहीं. इराणीस पेश होऊं न देतां तुह्मी व आम्हीं एकत्र होऊन, पेशजीचें उसनें घेऊन अगदीं नेस्तनाबूद करावा. अवदल्ली इराणी मोठ्या उल्हासें मजल दरमजल येतो, त्यास ठायींचेठायीं ठेविल्यास उत्तम आहे. इराणी याणीं लाहोर फत्ते केली. बादशाही सिंहासनें मोडीत चालिला. असें असतां तुह्मीं इराणीस अंग दिल्हें, हें उत्तम केलें नाहीं." ह्मणोन बहुता प्रकारें वकिलांनीं बोध केला. परंतु सुजातदौले यांणीं व मनसूरअल्ली यांणीं स्वहित न पहातां न ऐकतां पेशवे बहादूर यांचा व जाटांचा उपमर्द करावा हा दृढोत्तर विचार करून वकिलाबरोबर गुर्मीचें बोलणें सांगून पाठविलें. तदनंतर सुजातदौले व मनसूरअल्ली या उभयतांनीं आपले वकिलाबरोबर सांगून पाठविलें कीं, "रजपूत व जाट दिल्लीपत बादशाही चाकर असतां त्या बादशहाबरोबर बदमस्ती करितात, त्यांसही जरब देऊन व तुह्मी हीं बंडें दरवर्षी या प्रांतीं येऊन बादशाही बळजोरीनें कायम करूं पहातां, येविशीं तुह्मांस इजा द्यावी हा मतलब आमचा आहे. यापरता दुसरा मतलब आ-

मचा कांहीं एक नाहीं." याप्रमाणें आपल्या वकिला-बरोबर भाऊसाहेबांकडे सांगून पाठविलें आणि आपण बादशाही अनुमतांत रजपूत राजे व रजवाडे व पठाण वगैरे वागत होते त्यांस फितात करून आपणास अनु-कूल केलें व चितोडकर राणे व उदेपूरकर व अमेरीकर व रामनगरकर व मारवाडकर असे एक मतांत आणून सदाशिवपंतांवर व जाटांवर बदनजर धरिली.

तेव्हां सदाशिवपंत अटीनें फौजेसुद्धां दिल्लीस दाख-ल झाले. दिल्लीचा बंदोबस्त उभयतांनीं करावा हा विचार करून सर्वांची आणभाक क्रिया बेलभंडार घेतले कीं, इराणीस नेस्तनाबूद करावा. हा सिद्धांत करून जाट जामदार बादशाही सल्तान्यांतील होते त्यांस सां-गितलें कीं, "आमच्या सल्तान्यास खर्चास पाहिजे सबब बादशाही जामदारखान्यांतून खजीना देववावा." असें बोलणें पडतांच जाट चित्तांत समजून उत्तर केलें कीं, "बादशाही खजीना हुकुमाविगर खर्च करावयाचा नाहीं. तुम्ही लुटावयास सिद्ध झाले असतां पुढें मागें आम्हांस नामोसी येईल." असा घाट बोल-ण्यांत आणून जाटानें फेरबदलीची गोष्ट सांगितली कीं, "आम्ही बादशाही चाकर बहुत दिवसांचे असतां आमचे डोळ्यादेखत ही गोष्ट घडावी ही रीत आम्हां जाट रजपुतांस अनुचित. बादशाही तक्त आमचें आम्हीं रक्षावें येथें एकनिष्ठपणें वर्तावें. हुकुमाविगर खजीना फोडावयास दक्षणी बारग्यांची फौज आली असतां बेलाशक तरवार चालेल आणि तुमचा आमचा भाई-पणा राहणार नाहीं. आम्ही बादशाही पूर्वापार चाकर

तुमचें एकंदर ऐकणार नाहीं. या उपर समजोन राहणें." असीं भाषणें नोकेझोकेचीं जाटांनीही भाऊसाहेबांकडे सांगून पाठविलीं. तीं सर्व भाऊसाहेबांनीं श्रवण करून सावध झाले आणि चित्तांत समजले कीं, जाटाचा विश्वास नाहीं. हा कार्यवादु, समयास फिरून पडेल. आह्मांस हाच शत्रु. याचा भरंवसा नाहीं. तेव्हां दृढोत्तर विचार करून मनोधारणास्तव भाऊसाहेब यांनीं उत्तर सांगून पाठविलें कीं, "तुह्मांस जें मान्य तें आह्मांसही मान्य." असें सदाशिवपंतभाऊ यांणीं व मल्हारजी होळकर यांणीं सांगून पाठविलें. "यांत अणुमात्र तफावत नाहीं. या उपर तुह्मी कराल तेंच प्रमाण, ही खातरजमा असों देणें. बादशाही कायम करावी आणि शत्रूचा पराभव करावा. मागें फिसाइतामुळें बुबुबेगम यांणीं बादशाहीचा नाश बहुत केला आणि सगळी बादशाही बुडविली. कांहीं स्वहित पाहिलें नाहीं. बेटी देऊन इराणी शेर केला. अटकपार होऊन हा कालपावेतों आला नवता. शहा बादशहा यांणीं बाबर बादशहा काबीज केले. अलमगीर बादशहानीं प्रौढ प्रताप सामान्य केला नवता. इराणी, दुराणी, मुलतान, मस्कत पूर्वकालीं ज्यांचे दहशतीनें थरथर कांपत होते, त्या बादशहांची अब्रू गृहकलहामुळें अगदींच गेली. बादशाहीची जागा इराणी दुराणी आणि गिलच्या यांस केवळ पायवाट झाली. दौलतींत मुरब्बी अमीर व दिवाण समजदार, शहाणा, नीतिवंत माणूस कोणी राहिला नाहीं. आह्मी फरजंद, लहान माणूस न हों. जेणेंकरून बादशाही सलामत राहील

तेंच करावयास आलों आहों. हा गोष्ट [illegible]स [illegible] आणितां आमचा तुह्मांस बेविश्वा[illegible] [illegible] [illegible] तुमचे प्रत्ययास दिवसेंदिवस येईल. इरा[illegible] [illegible]द-शाहीचा नाशकर्ता अब्दल्ली याणीं भर देऊन अगदींच बादशाही बुडवावी या विचारावर प्रवृत्त झाला. आणि मनसुरअल्ली व सुजातदौला अवांतर कारमारी इराणी दुराणीकडे मिळाले. तुह्मी बादशाहीचे दुवागीर, इमानी आहां. आमचा वसवसा काहींमात्र न धरितां एक दील होणें. इराणीचा हिशेब कोण धरितो ? आ-मचे खातरेंत नाहीं. तुह्मांजवळ आम्हांविषयीं हरएक बाबेविशीं कफारत पडते. त्या गोष्टीवर न जावें. जे बदनजर धरून वर्तणूक करितील त्यांस त्यांचा कुल-स्वामी पाहून घेईल. तुह्मी मुरबी सर्व जाणत असतां अगदीं छान न केला. नजरेनें पाहून आम्हांस मग दोष ठेवावा. हें चांगलें नव्हे." याप्रमाणें बहुत प्रकारें युक्तिप्रयुक्तीनें बुद्धिवाद केला. परंतु जाट अविश्वासू. त्यांणीं भाऊसाहेबांस विश्वास दाखवून मनसूरअल्लीकडे व सुजातदौला याजकडे परस्परें सूत्र लावून इराणी-सुद्धां भारी फौजेनिशीं एकाएकीं दिल्लीस आणिलें. ते कालीं महासंकट दुर्घट प्राप्त झालें. जाट याचा भरं-वसा पूर्ण सदाशिवपंत यांसि कळला.

या समयीं दोन शह रक्षून निघावें यांतच उत्तम आहे, याप्रमाणें मनसोबा करून सदाशिवपंत परम स-कोच होऊन बादशहाचें तख्त जडित नवरत्नाचें सुव-र्णाचें होतें तें फोडून, त्यांतील मुबलख द्रव्य काढून, फौजेस वांटून आपले बुद्धीनें फौजा संभाळून निवान

कालिंदीतटाकास दाखल झाले. जाटांत व सदाशिवपं-
तांत पातशहातीमुळें अंतर्यामीं परस्परें विकल्प वाटून
आला. स्नेहभाव रक्षिल्यामुळें व्यंगोक्ति दिसों दिली
नाहीं. केवळ सदाशिवपंतांनीं व जाटांनीं एकमेकांस
विरोध दिसों न दिला. परभारें जाट निघोन आपले
देशाचे सरदेस गेले. इराणीसही आपलें भय अणुमात्र
जाटांनीं दिसों दिलें नाहीं. याप्रमाणें सुरजमल्ल जाटाचा
मजकूर पूर्ण सदाशिवपंतांस कळोन आला. सदाशिवपंत
यांणीं आपली फौज व मल्हारजी होळकर व जनकोजी
शिंदे वगैरे सारी फौज दक्षणची कराराची सव्वादोन
लक्ष उरली व उत्तरखंडांतील मराठी फौज व रजपूत व
रांगडे व मेवाती आदिकरून एक लक्ष, एकूण सव्वातीन
लक्ष फौज, येणेंप्रमाणें जमाव एक ठिकाणीं करून
शिवाय पायदळ साठ सत्तर हजार, तोफखाना वगैरे
कारखानासुद्धां यमुनातटाकास इराणी येण्याचा रस्ता
कोंडून, तोफखाना पसरून, फळी बरून, चौफेर फौजा
उतरविल्या. दाणावैरणीकरितां बादशाई खालचा मुलुख
अगदीं वीस पंचवीस गांवपर्यंत चौफेर बेचिराख झाला.
दाणावैरण अगदीं बंद झाली. शेराची धारण झाली.
तेही मिळेनाशी झाली. वीस पंचवीस हजार फौज
चौफेर दिवसाचे मजलीस जाऊन भरवसा गांव असत-
नीळ ते लुटून आणावे तेव्हां अन्नपाणी मिळावें.
याप्रमाणें झालें. खजीनाही चालेनासा झाला. अगोदर
श्रीमंतांनीं दोन कोट रुपये हिंदुस्थानाचे मोहिमेस मा.
ऊमाहेबांकडे पाठविले व मल्हारजी होळकर याजकडील
खजिन्यांतील एक कोट व जनकोजी शिंदे यांजकडील

खजीना दोन कोट व शिवाय सरकारी दोन कोट मागाहून आले, एकून सात कोट रुपये लष्करांत पावले. आणखी एक [illegible] पुण्याहून रवाना झाला, तो लष्करांत पावलाच नाहीं. वीस पंचवीस हजार फौजेला मार्ग फुटेनासा झाला. खजीना पाठविला तो सुरंजेस व उज्जनीस व नरवरास व बेलशास अवांतर जागजागीं अटकून राहिला. लष्करचे कागदपत्र अगदीं बंद झाले. तेव्हां कुंभेरीकर जाट सुरजमल्ल यांणीं बंदोबस्त आपले तर्फेनें करून एक कोट रुपये लष्करांत पावते केले. बुंदेले यांणीं व बागलकोटकर यांणीं, व बंगाले खण्डकर यांणीं, सवाईराम जयसिंग यांणीं, व चितोडकर यांणीं गुप्तरूपें खजीना पाठविला, तो कुंजपुरावरच होता. त्याची बातमी बारग्यांचे फौजांस लागतांच एकाएकीं जाऊन, घोशा घालून खजीना लुटून नेला. तेथें मातबर अमिराचे व पठाणाचे व रोहिल्याचे कबिले होते ते अगदींच सांपडले. ते लुटून फस्त केले. आणि अटक करून ठेविले. सावकारी द्रव्य मातबरांचें व अमिराचें वगैरे मुबलक बादशाही खजीना शहाजाफराचे वेळचा होता तो जोरावारीनें लुटून फस्त केला. एकून नऊ कोट रुपये सरकार जामदारखान्यास दाखल झाले. कुंजपुरा लुटून दरोबस्त फस्त केला. द्रव्याची लष्करांत महामुरी झाली. तेव्हां तीन शेर धान्य मिळों लागलें. खाण्यापिण्याची वगैरे सरंजामाची उठवण मोडली. या विरहित दिल्ली संस्थानचा मुलूख दरोबस्त मारून लुटून फस्त केला.

ही हकीकत सुजात दौला यांणीं इराणीस तपसीलवार लिहून पाठविली. इराणी दुराणी दरकूच यमुना-

तीराम आले. पश्चिमेकडून वाट नदीचा उतरून, दोन तीकडे त्यांचा पूल बांधोन नदी उतरूं लागले. तेव्हां दमाजी गायकवाड व समशेर बहादर व विठ्ठल शिवदेव व अंताजी माणकेश्वर व यशवंतराव पवार व जनकोजी शिंदे वगैरे सरदार व पथके व इभ्रामखान गाड्दी यांजकडील सरदार पंचवीस हजार लोकांनिशीं बरोबर सात आठशें तोफा मोठ्या पल्लवाच्या व जेजाला व जंबुरे व गरनाला पुढें देऊन सरबत्ती केली. त्या सरबत्तीचे धडाक्यानें शत्रूकडील फौज जितकी यमुना उतरत होती तितकी ठार जाहाली; कोणी जिवंत राहिला नाहीं. मागिल दुमाल्यावर जो फौज होती त्या फौजेनें माऊसाहेबांकडील मारगिरीची दहशत खाऊन पळोन गेली.

तदनंतर इराणीकडे सदाशिवपंतांनीं वकिलाबरोबर सांगून पाठविलें कीं, तुम्हीच चढाई करून आलां तसेंच यमुना उतरून आलीकडे यावें अथवा आह्मीच तिकडे येतों. एक वेळ तुह्मांशीं व आह्माशीं लढाई व्हावी हाच संकल्प आमचे अंतःकरणापासून आहे. यांत तफावत नाहीं. असा सिद्धांत करून वकील पाठविले. त्या वकिलांनीं पत्राप्रमाणें वगैरे मुखजबानीचे जाबसाल निवेदन केले. अबदल्ली व सुजातदौला व मनसूरअल्ली या त्रिवर्गांनीं तीं पत्रें वाचून पाहून म्हणूं लागले कीं, "मराठे बडे कट्ट लढनेवाले उनके आंगु खुदा खडा रहनेका नहीं अनाजका दुकाल पडा तोबी लढनेकू हटेले खडे रहते है इस लढाई खातर सबने बडी धूम मचा दोई. सल्ला करनेकू कुछ लोक भेजते नहीं. मराठे लोगोंका बडा जोर नजर आताहे. लढाईके खातर यो

ठाणे.

दोन सो कोस दुनयाबी बेचिराख हो रही, क्या कोर-ना ?" अशीं उत्तरें दिलगिरीची [illegible] पठाण रोहिले यांणीं श्रवण करून उत्तर दिले कीं, " या उपर बारग्यांची फौज चढून लढाईच्या उद्देशें आली असतां बेलाशक मोहरम करूं. यांत अंतर नाहीं. गलीम बहुत बदमस्त जोरावर जाहाला. त्यास आम्ही यमुना उतरून पैल तीरास येतों. याप्रमाणें पत्राचीं प्रतिउत्तरें लिहून सदाशिवपंत भाऊंस वस्त्रें व घोडा व शिरपेंच व मोत्याचा तुरा व जडावाची कंठी व शुभ्र-वर्ण ऐरावतीतुल्य हस्ती, मुलतानी तरकस कमाना दोन, येणेंप्रमाणें वकिलाबरोबर देऊन सदाशिवपंत भाऊंच्या लष्करांत आले.

वकील रवाना केल्यानंतर अबदल्ली व सुजातदौले व मनसूरअल्ली या त्रिवर्गांनीं फौजेसहवर्तमान जीविताचा संकल्प करून, दोन लक्ष सेनासहित तोफखाना मागें टाकून पांच सातशें नावांचा पूल बांधोन लष्कर तमाम उतरूं लागलें. तेसमयीं तेथें बहुत मारामार जाहली. बारग्यांकडील तोफखाना सुरू जाहल्यामुळें इराणी-कडील लोक फारच जाया जाहले. परंतु तितुका अग्नीचा पर्जन्य पिऊन, लढाईचा गुमान न धरितां, इराणीकडील फौज दरोबस्त यमुना उतरून दक्षणतीरास आली. मागें कौरव पांडवांचें युद्ध जाहलें तें पुराणोक्त थोर वक्ते सांगतात आणि श्रोते ऐकतात. तें वर्तमान प्रत्यक्ष पहाणें प्राप्त जाहलें. कुरुक्षेत्रीं पश्चमेकडे इराणी-कडील सरदार फौजेनिशीं व पूर्वेकडील बाजूस सदाशिव-पंत बहादर सेनासहवर्तमान उभे राहिले. अघाडी पिछाडीस

गोठास गोट भिडले. इराणी दगेखोर म्हणून सदाशिवपंत सावध रीतीनें राहिले.कामाठी व बेलदार आणून लष्करा-भोंवतीं खंदक रुंद पंधरा हात व उंच दहा हात याप्रमाणें तयार केला. सर्व तोफखाना लष्कराभोंवता पसरून रात्रंदिवस सावध राहिले. कोणी युद्धास प्रवर्तेना. दोन महिनेपर्यंत मुक्काम पडला. लष्करांतून तफावतीनें मुक्काम करावा तो न करितां इराणी हांवभरी होऊन पिच्छा पुरवूं लागला. याजकरितां पेशवे बहादूर हटातटानें इराणीच्यालष्करा जवळच राहूं लागले. मुलूख अगदीं वीस पंचवीस गांवपर्यंत बेगर्द बेचिराख जाहला. दाणा-वैरण मिळेनासी जाहली. सदाशिवपंतावर मोठा तवईचा वक्त गुजरला.

प्रथम सदाशिवपंतांनीं आपली फौज व सरदार तयार करून गोठ सोडून बाहेर निघाले. तीन टोळ्या केल्या. एक पूर्वेकडे गोठ पाठीशीं घालून मल्हारराव होळकर पन्नास हजार फौजेनिशीं पुढें तो-फखाना देऊन उभे राहिले. उत्तरेकडे खांसा विश्वास-राव व समशेर बहादर व जनकोजी शिंदे साठ हजार फौजेनिशीं उभे राहिले. व पश्चिमेकडे खुद्द सदाशिवपंत व यशवंतराव पवार व आपाजी जाधवराव वगैरे साठह-जार फौजेनिशीं उभे राहिले. व इराणी दुराणी यांणीं आपला गोट सोडून तयार होऊन आले.त्यांणींही आपले फौजेच्या तीन टोळ्या केल्या. अबदल्ली व सुजातदौले व हस्तनापूरवाशी, मनसूरअल्ली वगैरे उभे राहिले. प्रातःकाळच्या पांच सात दिवसापासून सूर्यअस्तपावेतों युद्ध जाहलें. सदाशिवपंतांकडील तोफखान्याच्या अग्नीचा

मार जबरदस्त जाहला. तितकी आग पिऊन गिलचे चालून आले. तेसमयीं सदाशिवपंतांनीं मागें पुढें अणुमात्र न पाहतां इराणीच्या फौजेवर चालून घेतलें. तेथें हातघाई मोठी जाहली. नामी नामी सरदार सदाशिव. पंतांकडील ठार जाहले. धारकरी शिपाई हजार बाराशें रणांत पडले. जखमी हजार बाराशें जाहले. व हजार बाराशें घोडे तळावर राहिले. हस्ती नग पंचवीस ठार पडले. अबदल्लीकडील पठाण चार हजार ठार जाहले. याविरहित उंट नफर पांचशें व बाणाच्या कैच्यांचे व दारूगोळ्याचे व बातमीचे सांडणीस्वार मिळोन बहुत जायां जाहले. जखमी माणूस बहुत जाहले. सुजातदौले याजवर लढाईचा मोठा कहर वर्षला. मनसूरअल्लीकडे लढाईचा प्रसंग थोडा बहुत पडला. हातघाईमुळें मनसूरअल्लीकडील लोक साडेसातशें कामास आले. शिवाय सहस्रावधि जखमी जाहले. हस्ती नग पंधरा व उंट नफर दीडशें येणेंप्रमाणें ठार पडले. अबदल्ली शिकस्त खाऊन फौजेसुद्धां मागें सरून आपले गोठांत गेले. सुजातदौले व मनसूरअल्ली आपआपले गोठांत गेले. मराठे यांणीं लढाईची शर्थ केली. आजपर्यंत तिमिरलंगापासून बहुत दिल्लीच्या सिंहासनावर बादशहा जाहले. पुंड पाळेकरी व रजपूत रांगडे व मेवाती, मारवाडी इत्यादिक जाहले, परंतु अशी लढाईची मर्दुमी कोणींही केली नसेल. मराठी फौज आम्हांस मोजतां दिसत नाहीं, याजकरितां मोठ्या तरतुदीनें आपल्या लष्कराभोंवते छबीने रात्रंदिवस मोठ्या मोठ्या सरदारांचे नेमून देऊन हुशारीनें राहिले.

या उपर इराणी व सदाशिवपंतांनीं दम खाऊन आपल्या गोठासमीप चवक्या पहारे कडोविकडीचे ठेवून तयारींतच उभयतां होते. अशा अवकाशांत इराणी यांणीं आपल्या तर्फेनीं आणखी एक वेळ वकील पाठवावा असा सिद्धांत करून सुजातदौले व मनसूरअल्ली या उभयतांचें संमत घेऊन रहिमतखां व रसूल पठाण व मणिराम रजपूत व महादाजी सुभानराव ऐसे चौघेजण पाठविले. कारण कीं, "तुह्मीं जोरावार होऊन अटकेची सरहद्द व मारवाड व लाहूर प्रांत व बंगाला व अंतरवेद व काशी, प्रयाग व गया व काश्मीरपावेतों मुलूख काबीज करावयाची उमेद धरून बादशाई खजीना बंद केला. अटकेपलीकडे ठाणीं घालावीं, चितोड व द्वारका व गुजराथ आदिकरून खालसा मुलूख केला. आग्रा प्रांतांतील खंडणी घेऊन अंमल करितां; याखेरीज दिल्ली ह्मणजे बादशाई तक्ताची जागा, तेथील अमर्यादा करून फौज दरवर्षीं पाठवून कैदकानू तुह्मीं आपली बसविली. याप्रमाणें काशीपलीकडे दमाऊ कमाऊचे पहाडापर्यंत अंमल सुरू करूं पहातां. बद्रिकाश्रमपावेतों जावयाची उमेद धरितां. रूमशाम येथें एकछत्री राज्य करावें, चतुःसमुद्र पावेतों पृथ्वी पादाक्रांत करावी, ही इच्छा रूमशामचे वडे बादशहा यांणीं नऊशें नऊ संदित पेगंबर सुलतान महंमद यांणीं फर्जंदास हुकूम केला कीं, दिल्लीपत बादशहानीं आह्मांस कुमकेस बोलाविलें. तुह्मीं अटकपार होऊन दक्षणेंत जाऊन दिल्लीपत बादशाहीचा मुलूख काबीज करून बंदोबस्तानें दिल्लीपतीची हुरमत राखावी.

या कारणास्तव आह्मी फौज घेऊन दिल्लीपतीच्या कुमकेस आलों. दिल्लीश्वर ह्मणजे केवळ ईश्वरी अंश, संस्थान सर्व हिंदू मुसलमानांस वंद्य; असें असतां बादशाहींत फितूर जाहला? रजपूत राठोडे व अवंतर थोरथोर संस्थानकारिते जबरदस्त आहेत, ते तुह्मीं कसोसीत आणून दिल्लीपत बादशाहीचा व सुरळीतपणाचा जबा बसवून देऊन, तुह्मीं आपले स्वारीचा खर्च दिल्लीपतीपासून घेऊन आपले स्वदेशास जावें. व चितोडकर राणे संग्रामसिंग व उदेपूरकर व अमेरीकर व सवाई जयसिंग जैपूरकर, याशिवाय बावन्न उमराव यांणीं बादशाहीच्या जहागिरी बंद केल्या आणि तुह्मांशीं मिळून संपूर्ण हिंदूमय करूं पहातात. बादशाही सिंहासन अनादि होतें, तें ज्यांनीं बुडविलें त्यांचीं पारिपत्यें करावीं, व तुह्मांसही बेकैदी चालल्यास इजा द्यावी, सबब आमच्या खावंदांनीं आह्मांस रूमशाहून विदा करून पाठविलें. तुमचा पिच्छा पुरवावा लागेल. कारण कीं, तुह्मी अमर्यादा करून दक्षणेंतील बादशाहीचे खावंद निजाम उल्मुल्ख व तुकुशा व बिजापूर येथील इदलशा, तैसीच बेदर व दौलताबादसारिख्या जागा, अमदानगर व कर्नाटक काबीज करून हैदराबादेस मोर्चे लाविले. सहासुभे दक्षणचे किलिजखां मुतालक व फत्तेजंग बहादूर व तोलेजंग बहादूर व शिद्धी अमीर वैगरे बादशहाजादे दिवसेंदिवस खालीं आणले व ब-हाणपूरकर व औरंगाबाद व सांदेबिदूर व त्रिचनापल्ली व श्रीरंगपट्टण व मछलीबंदर व समुद्रतीर व गोमांतक व तमाम कोंकण व खं-

बांयत अटंनर समुद्रांतील किल्ले महाकुबल जागा एका परीस एक बांक्या सुरंज, भेलसे, गढेमंडळें, खानदेश, नेमाड, मन्माड व वऱ्हाड व खेचीवाडा व हडोती मुलूख काव्यादाव्यानें सर करून, हांवभरी भरून दिल्लीस हिंदुपत बादशहा बसवून बेवीस उमराव पिढीजादे नांव बिनांव केलेले तुमच्या दहशतीनें कितीक मांडलिक जे आपल्या जागा सोडून फकीर होऊन देशांतरास गेले. सर्व बादशाही तुह्मीं मराठियानीं बेकैदी करून बुडविली. अलमगीर बादशहाचे वेळेचे नामी नामी उमराव शास्तेखां व असतखां व झुलपुकरखां नबाब नसरतजंग व हिंमतखां व फत्तेसिंग व मनसूर अल्लीखां पठाण व खानखां व इभ्रामखां व हफ्तहजारी व जामत अल्लीखां व फर्दुल्लाखां व फत्तेखां व हसनखां व रणमस्तखां व महमदखां व खावंदखां व कासमखां व किलिजखान, जैसिंग व संग्रामखां जोरावरसिंग व महिपतसिंग असे थोरथोर यांचे बेटे व भाई व जांवई यांस गर्दीस मेळवून नेस्तनाबूद केलें. तसा हा मजकूर नव्हे. एवढी बादशाही, अनादि तक्त, याच तक्तावर युधिष्ठिर बसत होते, तें तक्त तुम्हीं फोडून बादशहा परागंदा करवून आणखी अटकपार होऊन रूमशामची बादशायत घ्यावयाची मसलत करून, तेथीलही सरदेशमुखीची कैदकानू बसवून हक्क घेऊं पहातां. यांत कोणती किफायत आपण पाहिलीत? पेशजी बादशहा कृपावंत होऊन साडेसहा सुभे दक्षणेंतील सरदेशमुखी तुह्मांस करार करून दिल्ही, तो वंत अनुभवून सुखरूप रहाणें. जाजती उपद्रव मुलखास व बादशहास द्यावयाची गरज नाहीं. नर्मदा दक्ष-

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

णतीरापासून पलीकडील हद्द तुम्ही आपली [illegible] करून असावें. आणखी तुमचे फौजेस घा[illegible]ण्य[illegible] कोटि रुपये व एक कोटि रुपये स्वारीखर्चे यणेप्रमाणें रोख देऊन बादशाही सनद नवीन करून देतों. त्याबरहुकूम घेऊन बादशाहाची नौकरी करीत जाणें. हा करार असल्यास सलूख संपादिला जाईल. ही गोष्ट तुमचे खातरीस न येई तरि लढाई करावी लागेल. याचा पक्केपणें विचार करून सांगितल्या गोष्टी मान्य असल्यास लिहून पाठवाव्या. त्यासारिखे आह्मी बादशाहाची खातरजमा करून येतों. सेवकपणाचे धर्मानें बाशहाचे पायांजवळ वर्तणूक करून, बादशहाचे खिजमतीस एक साल राहून, सरफराई करून घेणें. जिद वाढविल्यास कामास येणार नाहीं. त्यांत तुह्मी माकूल आहां.

याप्रमाणें सर्व मजकूर इराणीच्या वकिलांनीं सदाशिवपंतांस समजाविला. तो मजकूर सदाशिवपंतांनीं श्रवण करून मातबर सरदार व मल्हारजी होळकर यांचे विचारें ठरवून सांगितलें कीं, “ हिंदुपत बादशाही येथील बंदोबस्त करणें तो आह्मीच करूं. तुह्मी पर पातशाहाचे असतां आपली हद्द सरद टाकून मनसूरअल्ली व सुजातदौले यांचे विचारें हांवभरी होऊन आलीकडे आलां. मागें तुह्मींच येऊन अगदीं बादशाही बुडविली. हल्लीं मिरा बुबु बेगम यांचे अनुमतें येऊन व्यर्थ दंगा आरंभिला. ही गोष्ट इनसान नव्हे. मागें आलां ते समयीं आह्मी असतों तर बादशाहीची खराबी होऊं न देतों. आतां तुह्मी आमचे मसलतीस अडथळा करणार कोण ? आमचे चित्तास येईल त्याप्रमाणें

करावयास श्रीमंत नानासाहेब समर्थ आहेत. स्मशा-
मची खबर आह्मी घेणार, तेथें तुमचा मजकूर कोठें ?
तुह्मी आपल्या मार्गे अटक उतरून जावें. भाईचारा
राखावयाचा असल्यास लौकर फौजेमुद्धां माघारें जावें.
जे जे तुह्मांस आमचे पारिपत्यास्तव घेऊन आले असती-
ल त्यांनीं तरी कोणती किफायत पाहिली ? आह्मी तु-
ह्मांस एकंदर दबून राहणार नाहीं. आह्मी सर्व गोष्टींनीं
तरतूददार आहोंत. हिंदुपत बादशाहीचे वगैरे माणूस
मातबर उमदे दौलतकोर्न पंतप्रधान बहादूर आहेत. त्यां-
जवर सर्व राज्याचा भार आहे. चार लक्ष फौजेचे बाद-
शहा श्रीमंत छत्रपति महाराज सातारकर, त्यांचा जय
प्रताप विक्रम पराक्रम वरद हस्त आमचे मस्तकीं आहे.
सर्व धरित्रीचें राज्य स्वामीकृपेनें संपादितों. आजपर्यंत
संपादीतच आलों. तुमचे हुकुमाची तमा धरीत नाहीं.
लढाई करावी हाच आमचा निश्चय आहे." असें साफ
सांगितलें. व सदाशिवपंतानीं आपले तर्फेनें लक्ष्मण ब-
ल्लाळ व वुरूणशा या उभयतांस इराणीकडे वकिलीस
पाठविलें. त्यांस तेथें बोलण्याची आज्ञा झाली जे, तुह्मी
फौजेमुद्धां माघारें जावें. उद्यां येथें रहावयास दरकार
नाहीं. अशिप्रमाणें वकिलांनीं मजकूर निवेदन कारितांच
अबदल्लीस परम विषाद आला. आणि तेच क्षणीं भाऊ-
साहेबांकडील वकिलांस अवकाश न घेतां माघारें रवाना
केलें. आणि सांगोन पाठविलें कीं, उदईक लढाईस
तयार होणें. आह्मी चालून येतों.

यापमाणें वकिलांचीं कठोरपणाचीं भाषणें सदाशिव-
पंतांनीं समजून घेऊन, मजालस करून, तमाम लहान

थोर सरदार बोलावून आणून सरफराई केली. मोत्यांच्या कंठ्या व शिरपेंच व जडावाचीं कडीं व कलग्या व तुरे, चौकडे व मंदिल व शालजोड्या व बादली चिरें व घोडे व हत्ती व पालख्या व वस्त्रें व आबदागीर व फत्ते जाहल्यावर मानपानाच्या ताजिमा व कोणास गांव व परगणा व कोणास सचंतर एक देशींचें राज्य, अवांतर सरदार लोकांचीं मनोधरणेचीं बोलणीं बोलून, सदर्हूप्रमाणें बक्षिसें देऊन, एक दील होऊन, सर्वांस स्तुतीनें गौरवून नांवाजिलें. तेव्हां थोर थोर सरदारांनीं उत्तर केलें कीं, " भाऊसाहेब महाराज ! आह्मी तरि जीवित्वाची तमा धरीत नाहीं. इराणीची कथा किती ? मारून गर्दीस मिळवून देऊं. " हाच निश्चय सर्वांचा होऊन आपआपल्या शिबिरास गेले.

पहांटेची दोन तास रात्र उरली तेव्हां सरकारी साहेबनौबत लढाई-प्रसंगाची करून नकीबास ताकीद करावयास सांगितली. नकीबांनीं सर्व लष्करांत फिरून ताकीद केली. प्रातःकाळ होतांच तमाम फौजेमुद्दां सरदार शिलेपोस तयार होऊन आले. एकापरीस एक, भीमार्जुनासारिखे महावीर, दर रिकीबीस तरवार गाजविणारे, अंगीं वीरश्रीची वारी, रणांगणाचा शृंगार करून, बुग्या व बखतरें व टोप, चिलखतें, बिन्या व बिरजे व वस्त्रें तकटी व मुक्तमाला व मस्तकीं तुरे व कलग्या व अंगींचे बारा अलंकार व जरीचे अबदागिरे करून शोभायमान, हातीं पट्टे व गुरगुज व फिरंगाणा व बिचवे व कटारा व पेशकब्जे व वाघनखें व भाले व कोयते व परीघ व पट्टीश व फरश व गारभांडीं व

सांगा व वरच्या व बंदुका, कटीतटीस शस्त्रसंभार बांधून आपआपलाले वाहनारूढ होऊन, अंगीं स्फुरणें अतिशय, युद्धास जावयास अति उदित, स्वामिसेवेशीं तत्पर, अशा आवेशाचे पुरुष हजारों हजार सिद्ध झाले. अनमूट, नव्या उमेदींचे, शिपाईगीरीची शर्थ व्हावी ह्मणून उमेदवारीनें बिरदें धांवून, शिरी समले सोडून, घोड्यास जडावाचे अलंकार करून, एकाहून एक आगळे, जीवित्वास तृणप्राय मानणारे असे शहाण्णव कुळींचे मराठे घोड्यास नटनागर, जरीबादली पाखरा व शिन्या सडका व पायीं तोडर बांधून घोड्यांस थापटून उभे राहिले. तसेच हवदे व अंबाऱ्या व नवरत्नांच्या मुक्ताभरणी झालरा याप्रमाणें गजभार सिद्ध जाहले. जंबुरे व न्हेकलें व जेजाला व सुतारनाले व थोरलीं भांडीं येकूण आवाज दीड हजार, याप्रमाणें आराबा पसरून व बाणांच्या कैच्या उंटांवर लादून, बाण लावणारे सहवर्तमान एकदांच सकळ समुदायानिशीं सिंहनादें गर्जना करून रणास जावयास निघाले.

नंतर सैन्याचे चार भाग करून दक्षिणचे बाजूस खांसे विश्वासराव साहेब वीस हजार एकांड्यांनिशीं, त्यांचे डावे बाजूस मल्हाराव होळकर पन्नास हजार फौजेनिशीं, व पूर्वेस भाऊसाहेब साठ हजार फौजेनिशीं व पश्चिम दिशेस जनकोजी शिंदे पन्नास हजार फौजेनिशीं, व उत्तरचे बाजूस तोफखाना साठ हजार पायदळासहित इभ्राईमखान गारदी याजकडील लोकांनीं मस्तकावर ढाला घेऊन, नग्न हत्यारें करून, सावधतेनें, धुम्मस न खातां, मांडीस मांडी देऊन, एक घोडा

राऊत न मिसळे अशा बेतानें निशाणांचे फरारे सोडून उभे राहिले.

इराणी दुराणी व हस्तनापुरवासी व दिल्लीपत बादशहा यांनीं फौजेच्या चार टोळ्या केल्या. एक्या टोळीस खांसे अबदल्ली पन्नास हजार फौजेनिशीं व दुसरे टोळींत सुजातदवले पन्नास हजार फौजेनिशीं व तिसरे टोळींत मनसूरअल्ली तीस हजार फौजेनिशीं, मध्यभागीं मुख्य इराणी पाऊणलक्ष फौजेनिशीं, याप्रमाणें आपआपले सरदारांस व पायदळांचे जमातदारांस निक्षून ताकिदी रणप्रसंगाच्या होऊन बेलाशक चालून घेतलें. तोफखान्यावर जाऊन पडले. एक रंजकेची सरबत्ती होतांच दोहों दळांत धुंधःकार होऊन एकमेकांस दिसेनासें जहालें. धुरानें दिवाकर अगदींच आच्छादित जहाला. आपपर कोणी ओळखेनासें जहालें. दोन प्रहरपर्यंत एकसारिखा तोफखाना उभयतांकडील सुरू होता. धूर निवारण होतांच पाहूं लागले तों अमित्राकडील पठाण वीस हजार कामास आले. व सदाशिवपंत भाऊंकडील लोक पायदळ. व घोडेस्वार अजमासें वीस पंचवीस हजार कामास आले. श्रीमंत विश्वासराव साहेब व सदाशिवपंत भाऊ व मल्हारजी होळकर व जनकोजी शिंदे व यशवंतराव पवार व अंताजी माणकेश्वर व अप्पाजी जाधवराव व विठ्ठल शिवदेव विंचूरकर, समशेर बहादूर वगैरे धारकरी व हुजरातीचे लोकांनीं व एकांड्यांनीं एकदांच सर्वांनीं श्री जाश्वनीळाचें स्मरण करून व शाहू महाराज छत्रपति यांचें नांव घेऊन, हर हर महादेव ! ! ही गर्जना

करून घोडे घातले. इराणी दुराणी व अबदल्ली व सुजादौला व मनसूरअल्ली व अबदल्ली नादरशहाचे बेटे व दिल्लीपद बादशहाकडील खासे खासे बादशहाजादे व राठोड, रांगडे व रजपूत व मेवाती व हस्तनापूरवासी यांनीं " या अल्ला ! खुदा या रहिमान रहिम ! " याचा उच्चार करून एकदांच नीट कमरग्यांत शिरले. तेव्हां तीस हजार फौजेनिशीं जनकोजी शिंदे व समशेर बहादूर यांनीं त्यांजकडील सर्व फौज पोटीं घालून घोडे घातले. तेथें मोठी झोटधरणी होऊन वरकड हत्यारांची लढाई व तिरंदाजी ही राहिली. लढाईची हातघाई झाली. भाला व बिचवे व गुरगुरजे व जमदाडा व वाघनखें यांचे चपेटे फार झाले. एकमेकांच्या गळ्यास मिठ्या मारून पुढचे पाय पुढें टाकूं लागले. कोणी मागें फिरेना. सक्रोध होऊन, अवसानें धरून एकमेकांवर पर्जन्यप्राय कोसळूं लागले. मल्लयुद्धाचें मारणेंच कडोविकडीचें परस्परें दाखवूं लागले. या युद्धांत वांचून पुनः दक्षणेंत जाऊन संसार करावा ही अस्ता कोणीं ठेविली नाहीं. कोणी महाकाल, कोणी कृतांत असे भासले. कितीकांस मूर्च्छना येऊन रणभूमीस निचेष्टित पडले. कितीकांचीं शरीरें त्या गर्दीच्या खंदळींत चिरडून गेलीं. कितीकांचे हात पाय तुटून नुसते कोथळे रणांत राहिले. कितीक वीर भंबाळ होऊन भयंकर दिसूं लागले. कितीक वीरांच्या पाठींतून भाला हृदयापार होऊन आपआपले पुण्यानें कोणी विष्णुलोकास गेले, कोणी कैलासास गेले, कोणी सत्यलोकास गेले, कोणी इंद्रलोकांत गेले. याप्रमाणें दुसरी लढाई सात तासपर्यंत

झाली. मोठे मोठे सरदारांहीं व शिपायांनीं लढाईची शर्त केली. रक्तोदकें भूलिंगास अभिषेक झाला आणि शिरकमलें हींच भूलिंगास कमलें अर्पण जाहलीं. मल्हारराव रामचंद्र त्या रणांत आक्रंदत पडले होते. तें दुःख त्यांचे चिरंजीव गणपतराव मल्हार यांणीं डोळ्यांनीं पाहून, आपले पित्यास पुरे करून, आपण आपला शिरच्छेद करावयास उदित झाले. ते समयीं सदाशिवपंतांनीं पाहून सगद्गद होऊन उत्तर केलें कीं, " आत्महत्या करूं नये. उदईक सर्व आपण इंद्रसभेस जाऊं." असें ह्मणून राहविलें. सदाशिवपंतांकडील व शत्रूकडील एकंदर माणूस पस्तीस हजार ठार पडलें. दहा बारा हजार घोडा मोकार फिरूं लागला ! मदोन्मत्त हत्ती पाऊणशें रणप्रसंगीं पडले. इराणी दुराणी वगैरे शत्रूकडील उंट नफर दोन हजार कारखान्याचे जायां झाले. याप्रमाणें संग्राम महाधुरंधर जाला. या युद्धांत बळवंतराव गणपतराव मेहेंदळे यांजवर वार पडला. त्यांचे मुर्दावर मोठी गर्दी गुजरली. तें सदाशिवपंतभाऊनीं पाहून, घोड्याखालीं उडी टाकून, दोहों हातीं पट्टे चढवून, जिवाची तमा न धरितां धीट होऊन नीट फौजेंत चालून घेतलें. कत्तल* करीत चालले. ते समयीं जनकोजी शिंदे व त्र्यंबकराव मार्तंड व सदाशिवपंत पुरंधरे व महिपतराव चिटणीस व विठ्ठल शिवदेव व फकीर महंमद व फिरंगोजी पवार व राणोजी जाधवराव,

*आलीकडील इतिहासकारांस सदाशिवराव भाऊंत कोणताच गुण आढळत नाहीं. ते सर्वस्वी त्यांस मूर्खच ठरवितात. पण मागील बखरी लिहिणारे मंडळीस सदाशिवराव भाऊचें शौर्य आणि तेज अद्भुत दिसून आलें.

आपाजी जाधवराव व धर्माजी पात्रळकर व संताजी आठोळे व नरसोजी खैरात व हैबतराव सालसकर व सयाजी पायघुडे व नरसाजी बिरजे व गुणाजी भापकर व लिंगोजी केशव व सदाशिव आप्पाजी व जानंमहंमद व भागोजी डफळे व इंद्रोजी रसगळ व रस्तुमराव पांढरे व इंद्राजी कदम व बळवंतराव सासवडकर या सर्वांनीं घोड्यांखालीं उड्या टाकून पाय उतारा झाले. मागें पुढें पाहिलेंच नाहीं. तेथें मारामारी कांहीं सामान्य झाली नाहीं. ते समयीं स्वर्गीं इंद्रलोकींचे इंद्र सुद्धां सुरगण विमानांत बसून अंतराळीं पहावयास आले. धन्य त्या वीरश्रीवैभवाची ! बळवंतराव यांचा मुर्दा बळजोरीनें सदाशिवपंतांनीं आपले जमातींत आणिला. मर्दुमकीचा वहमा इराणीचा जिरला. त्या सपाट्यांत सदाशिवपंत भाऊंकडील व इराणीकडील व दिल्लीपत बादशाहाकडील व सुजातदौले व मनसूर अल्ली व हस्तनापूरवासी यांजकडील खांसा खांसा मोहोरा एका ताटांतील जेवणारा साडेसातशें कामास आला. दांणीं इराणी दुराणीचा मोहोरम केला. वीरांच्या मर्दुमीचा कळस जाहला ! एवढी लढाई जाहली परंतु कांहीं तफावत पडली नाहीं ! याजकरितां इराणी दुराणी अंतरीं दिलगीर होऊन ह्मणूं लागले कीं, "दखनी मराठे लोक बड हरामजादे ! तरवारीस आपणास ऐकत नाहींत. बादशाही लियाबिगर हं बी पीछे जानेके नहीं. सब सलतनत समेत हक्क होना ये अच्छा." असें ह्मणोन फिरून चालून येण्याची उमेद धरावी तों एवढ्यांत सदा-

शिवपंतांनीं कुतरओढ करून सर्व शत्रूंस आपल्या लष्करांत शर्तीशर्त करून दामटून घातलें.

इकडे सदाशिवपंत आपल्या लष्करांत जाऊन नामी नामी धारकरी व सरदार व पागे व पतके व गाड्यांतील जमातदार पडले होते ते रणांतून शोधून काढून कोणास पुरविले, व कोणास अग्नि डाग दिले, व ज्यांची ओळख पुरली नाहीं असे जे सरदार चाकरमाने होते त्यांस एकेक्या गर्तेंत शेपन्नास व शेंदोनशें घालून त्यांचा बुजविल्या. ब्राह्मण मंडळीस शेले दीड हजार करूनास लागले. या कलियुगीं दुसरें प्रत्यक्ष भारती युद्ध झालें. इराणी दुराणी व दिल्लीपत बादशाह वगैरे यांजकडील व सदाशिवपंत भाऊंकडील लोकांविषयीं व घोडेस्वारांविषयीं व तोफखान्यांविषयीं व पायदळाविषयींची बहुत खराबी जाहली ती लिहितां पुरवत नाहीं. पेशवे बहादूर यांजकडील थोर थोर सरदार व मानकरी व एकाण्डे व धारकरी व हुजरातींतलि लोक पडले त्यांचीं नांवनिशी मात्र लिहिली. इराणी दुराणी दिल्लीपत बादशहा वगैरे यांजकडलि लोक पडले त्यांची नांवनिशी ल्याहावी तर या कलियुगीं दुसरें भारत होईल, याकारितां श्रीमंतांकडील लोक लिहिले गेले त्यांची नांवनिशी तपशीलवार अशी कीं:—

| | |
|---|---|
| १ बळवंतराव गणपत. | १ कृष्णाजी मोरे. |
| १ गंगाधर नारायण. | १ चिमणाजी वाळके. |
| १ बाळाजी भोईर. | १ लखमाजी गोडे. |
| १ नारायणसिंग रेडे. | १ सिदोजी घारघे. |
| १ शिवराव अंबीकर. | १ मल्हारराव कोतकर. |

१ अमृतराव चवळे.
१ जयाजी भालेकर.
१ दयाळसिंग.
१ सिधोजी भोंसले रुजु
शेवळे.
१ तुकाजी गाढवे.
१ सयाजी थोरात.
१ हणमंतराव शितोळे.
१ हरजी रणदिवे.
१ हणमंतराव मोचले.
१ पदाजी मोहिते.
१ लक्ष्मणराव मानगिरें.
१ रहिमान गोरी.
१ नरसिंगराव चोपडे.
१ भिकाजी रासळे.
१ भिवराव पवार.
१ भिकाजी नळवडे.
१ कृष्णाजी विष्णु.
१ कमाजी सुखे.
१ सोनजी शिरके.
१ नारो हरि.
१ समजाजी वागवे.
१ मोराजी पडवळ.
१ अमृतराव मोरे.
१ निळकंठराव माने.
१ रामराव राणे.

१ बहिरराम रजपूत.
१ मानाजी रणदिवे.
१ गिरजोजी देवळे.
१ आनंदराव माने.
१ मलकोजी माने.
१ लखमाजी सांवत.
१ जावजी दमेकर.
१ बयाजी शिरके.
१ गंगाजी दाभाडे.
१ रामराव साटम.
१ यशवंतराव वाघ.
१ सिदोजी थोरात.
१ कर्णोजी पाळेकर.
१ हटेसिंग.
१ शंकराजी कांटे.
१ संताजी वाघ.
१ रामराव शिरके.
१ शिवराव कडु.
१ रामराव घुगरे.
१ मानाजी रणनवरे.
१ आप्पाजी जिरगे.
१ रामराव काळे.
१ यमाजी राजेगिर.
१ लखमाजी गाजरे.
१ सयाजी माने.
१ रामराव माने.

१ यमाजी शिरोळे.
१ भुजावरसिंग.
१ धोंडजी पवार.
१ शिवजी शेलके.
१ पिलाजी नवरे.
१ सदाशिव राजे.
१ बाबाजी घुगरे.
१ मुकूब शास.
१ सखाराम मोरेश्वर.
१ काशिराम तोडगे.
१ गोपाळराव शेळके.
१ पोथीराम रजपूत.
१ यमाजी गोफणे.
१ रंगराव शिंगाडे.
१ अमलशहा.
१ गणोजी माजरे.
१ शिदोजी कापशे.
१ आप्पाजी पोवळे.
१ यशवंतराव भापकर.
१ जावजी जाधव.
१ भानाजी मोरे.
१ संताजी नळगे.
१ म्हसाजी मोरे.
१ मल्हारराव शिंदे.
१ मणीराम रजपूत.
१ अप्पाजी हळदे.

१ तुकाजी थोरात.
१ बापूजी काटेकर.
१ सयाजी गुजर.
१ लिंगोजी थोरात.
१ दुल्लभजी पालेकर.
१ लिंगाजी कुराडे.
१ कृष्णराव पवार.
१ बिरदाजी पवार.
१ हरि विठ्ठल.
१ अप्पाराव बांडे.
१ भिवराव हरि.
१ सटवाजी पिसाळ.
१ देवीदास रजपूत.
१ पद्माजी पाटणकर.
१ सयाजी झसके.
१ विठ्ठलराव हरि.
१ सदाशिव गोपाळ.
१ विठ्ठलराव पांढरे.
१ धावजी माने.
१ भरमाजी वाघ.
१ नरसो व्यंकटेश.
१ जोत्याजी रणनवरे.
१ रंगराव बांडे.
१ यमाजी भापकर.
१ चिंतामणराव.
१ गंगाजी शिंगाडे.

१ शिवोजी नवरे.
१ यमाजी टकले.
१ मल्हारराव वाघ.
१ दामोदरसिंग.
१ सयाजी आभळे.
१ भवानजी सोनवणी.
१ चिंतामणराव गोविंद.
१ चिमणाजी विठ्ठल.
१ यशवंतराव भोगले.
१ जावजी माने.
१ सिदोजी साळवी.
१ बाजीराव मोहिते.
१ यमाजी मुरगे.
१ नारायणराव पांढरे.
१ मानाजी वांडगे.
१ नवसोजी वाळवेकर.
१ मल्हारराव धुमाळ.
१ माधवराव पाटणकर.
१ लक्ष्मण शिवदेव.
१ जगन्नाथ मल्हार.
१ गणेश रामचंद्र शिरोळे.

---

१३४ असामी.

येणेंप्रमाणें सरदार मातबर दहा हजारांचे व पांच हजारांचे व पांचशांचे व सातशांचे व शेंदोनशांचे असे ठार झाले. या वेगळे दोनतीनशें जखमी जहाले. ते वांचतां कठीण आहे. पायदळापैकीं बेबीस सहस्र माणूस कामास आले. या प्रकारचें रणकंदन झालें. घे घे मार ऐशी ध्वनी उठूं लागली. युद्ध दारुण झालें अबदली व इराणीकडील व मनसूर अलीकडिल व सुजातदौले यांजकडील खासे खासे सरदार पडले, त्यांची नांवनिशी तपशीलवार असामी बितपशील:--

१ खिरखान रयाजी.
१ गोरखान जी वकल.
१ महंमद हुसेन.
१ जिराइतखां पठाण.
१ अबदूलखां पठाण.
१ धर्माजीसिंग.
१ भुजावरसिंग रजपूत.
१ गलेफखां पठाण.
१ लाडखां पठाण.
१ तमालखां पठाण.

१ अनवारीखां पठाण.
१ अमृतराव पवार.
१ अर्जुनसिंग परदेशी.
१ रूस्तुमखां पठाण.
१ मुसायदखांपन्हींपठाण
१ गयालखां पठाण.
१ भिकाजी राम.
१ अजसिंग मारवाडी.
१ दाउदखां.
१ दावलखां गोरी.
१ निजामखां.
१ इमामखां खंदारी.
१ फकीर दाउद.
१ धनसिंग रजपूत.
१ केशवसिंग.
१ चंदीरखां पठाण.
१ अजमत् दौला.
१ गुलाबखां पठाण.
१ किराईरूज्नु संभासिंग.
१ बळरामसिंग.
१ फतेखां गोरी.
१ लक्ष्नण महादेव.
१ माधवसिंग.
१ मीरखां पठाण.
१ गाजरखान पठाण.
१ दाउदखां पठाण.
१ इजाफतखां पठाण.
१ दुदुखां पठाण.
१ फत्तेसिंग.
१ इजावतखां पठाण.
१ दाउदखां पठाण.
१ लालखां पठाण.
१ मजितखान पन्ही.
१ गंगासिंग.
१ घेलासिंग.
१ हुसेनखां पठाण.
१ बद्रीजमालखान.
१ किराईतखां.
१ गलेफखान रयाजी.
१ सुलतानखां पठाण.
१ हटेसिंग.
१ चांदखां.
१ खान रस्तखां.
१ भीमसिंग हजारी.
१ मनीखां पठाण.
१ खानम्याजखां.
१ रूपखान पठाण.
१ रूपसिंग.
१ शादुल्लाखां.
१ शामकाठी.

० असामी.

येणेंप्रमाणें नामी नामी सरदार दहा पांच हजारांचे व हजार दोन हजारांचे व चारशें पांचशांचे अमित्राकडील ठार पडले. व मनसूरअल्ली व सुजातदौला व अवदल्ली व हस्तनापूरवासी यांजकडील लोक पडले. त्यांची गणना लागली नाहीं. अजमासें पठाण वगैरे तीस हजार ठार झाले. दिल्लीपद बादशहाचे वकिलांनीं टीप लिहून सदाशिवपंतभाऊंस दाखविली व सदाशिवपंतांकडील वकिलांनीं याद पडल्या लोकांची नांवनिशीवार इराणी व दुराणी व मुख्य बादशहा दिल्लीपती यांस दाखविली. याप्रमाणें दुतर्फा नाश बहुत झाला.

इराणी अंतर्यामीं हिंम्मत न सोडितां सुजातदौला व मनसूरअल्ली यांस बोलला कीं, " ब्राह्मननें बडा गजब किया ! मराठे बडे जोरदार हटेले ! आटपले जातात असें दिसत नाहीं. सलूख करावा ये अच्छा. इस बातमे खुबी है. " असें बहुत प्रकारें सांगितलें. त्याजवरून त्या उभतांनीं सलूखाचें सदाशिवपंतभाऊंकडे सूत्र लाविलें. परंतु सदाशिवपंतभाऊंच्या चित्तांत सर्वथा सलूख करावयाचा नाहीं. त्यांचीं हत्यारें हिसकावून घेऊन देशोधडी करावें हाच निश्चय. दुसरा अर्थ नाहीं.

पाहिले लढाईंत, दुसरे लढाईंत व तिसरे लढाईंत जे जे सरदार नामी नामी व धारकरी व एकाण्डे व हुजरातीचे लोक व शागिर्दपेशा व राज्यमंडळीचे मानकरी पडले त्यांस तर मूठमाती दिली ; व घायाळ जखमी होते त्यांस औषधपाणी तबीबापासून करावें त्या उस्तावरींत भाऊसाहेब एक महिना लागले. तसेंच दिल्लीपद बादशहा व इराणी दुराणी व हस्तनापूरवासी इत्यादिकृ

उस्तवारीस लागले. सदाशिवपंत भाऊ व विश्वासराव साहेब या उभयतांनीं जखमी लोकांच्या दिवसांतून एक वेळ राहुटीस स्वतः पायउतारा जाऊन समाचार घ्यावा, याप्रमाणें पंथ चालविला. व जखमा बऱ्या झाल्या त्या शिपायांस पाणी घालून, नवीन बक्षिसें देऊन, संतोष करून हुशार केलें.

परंतु दाणावैरणीकरितां पेशवे बहादूर मोठ्या फिकिरींत पडले. लष्कराभोंवतीं दोनशें कोस उजाडी पडली. उपाय चालेनासा जाहला. शत्रूच्या लष्करांत यमुनेपलीकडून हर जिन्नस येत होता. कांहीं तोटा नव्हता. सदाशिवपंत भाऊंस मात्र मोठें संकट पडलें. त्या काळीं गोविंदपंत बुंदेले मामलेदार प्रांत सागर निसबत पंतप्रधान यांणीं खजीना व दाणा भरून समागमें फौज रखवालीस पंधरा हजार घेऊन खाविंदाचे कुमकेस जावें असा सिद्धांत करून निघाले. ही बातमी शत्रूच्या लष्करांत दाखल होतांच पाळथ राखून, शास्तेखां व झुलपुकारखां हे दोघे सरदार पाठवून, यमुनापार होऊन, सूर्योदयाचे समयीं एके रात्रींतून चाळीस कोस येऊन छापा घातला. तेथें मोठी लढाई झाली. परंतु बुंदेले यांजकडील फौज बेसावध होती याजमुळें गिलचानें लढाई देऊन पंत मशारनिल्हेचें शीर कापून नेलें, आणि ताटांत घालून भाऊसाहेबांकडे नजर पाठविलें. त्याचें वर्तमान असलें वाईटपणाचें भाऊंनीं प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहून केवळ कंबरच बसली. बुंदेले यांची स्त्री समागमेंच होती तिनें प्रेताबरोबर सहगमन केलें आणि दिवसेंदिवस अन्न मिळेनासें जाहलें. चार

चार फांके पडूं लागले. घोड्यास दाणा वैरण अ. गदींच मिळेनाशी झाली. मग महर्गतेची वार्ता त्यांनीं श्रवण करून सलुखाची वार्ता व युद्धाची तयारी करणें ही गोष्ट अगदींच टाकिली. चळविचळ न करितां थंड राहिले. भाऊसाहेब मोठ्या संकटांत पडले तीन उपोषणें सारे लष्करास घोड्या माणसांसुद्धां पडलीं.

तेव्हां मल्हारजी होळकर व जनकोजी शिंदे व दमाजी गायकवाड व यशवंतराव पवार व अंताजी माणकेश्वर व संताजी आटोले वगैरे लहान थोर मिळून सदाशिवपंतांशीं विचार करावयास आले. तों सदाशिवपंत भाऊ व विश्वासराव साहेब बिचव्यांत बसले होते, तेथून कचेरीच्या डेऱ्यांत येऊन खलबतास बसले. तेव्हां सर्वांनीं सांगितलें कीं, "आज सव्वा महिन्यांत तवाई सर्वांनीं सोसली. अन्न पाण्यावांचून घोड्या माणसांचे प्राण जातात. पुढें महाराज काय तजवीज सांगणें ती सांगावी ! अन्नावांचून हात पाय मुजले. तरवार कोणत्या रीतीनें करावी ? साहेबीं आजपर्यंत यश संपादून शत्रु पादाक्रांत केला आतां सर्व दौलत बुडवून नाश आरंभिला. दुसरें कांहींएक नाहीं. विनाश कालासारखी तुमची बुद्धि झाली. आपणांबरोबर आम्हां सर्वांचीं घरें बुडतात. आमचीं रांडा पोरें आमच्या डोळ्यादेखत इराणी घेऊन जातो, असा समय प्राप्त झाला. तुमचे बुद्धीस भ्रंश झाला, ह्मणून आपण तिळमात्र कोणाचें ऐकत नाहीं. उगीच हेका केला तो या समयीं फळास आला. सारांश आपण सर्वांचें मान्य करून सलूख करून देशीं गेलों ह्मणून गांडू जाहलों असा

अर्थ नाहीं. या हटानें सर्व लयास गेलें. कांहीं आहे तेंही जाणार. नकळे ईश्वराची महिमा. होणारा सारखी बुद्धि उत्पन्न होते. विचार हरल्यामुळें नैषधास व श्रीरामचंद्रजीस अपाय घडला, तसा प्रकार आपणासही घडोन आला. तुह्मांस श्रीसांबानें अजरामर ऐश्वर्य दिलें असतां, भाऊसाहेब ! तुह्मीं बुडविलें. आज तो प्रसंग प्राप्त झाला. सुबुद्धि सांगतां तुह्मांस श्रम वाटतात. पुढें कर्माची गति दुस्तर ओढणार त्यासारखें घडोन येतें. 'होणार तें कधीं चुकत नाहीं,' ऐसी वाडिली ह्मण आहे." ते वेळेस जनकोजी शिंदे यांणीं दृष्टांत दिला कीं, "रावणास श्रीसांबानें चवदा चौकड्यांचें राज्य करणें ह्मणून वर दिला असतां, श्रीसीतादेवी आणिल्यामुळें सर्व राज्य बुडविलें. बिभिषण आणि कुंभकर्ण वगैरे मंडळींनीं मंडोदरीसुद्धां सीता देण्याविषयीं उपदेश केला. परंतु कोणाचें न ऐकतां लक्ष पुत्र व सव्वालक्ष पौत्र व ऐशी सहस्र स्त्रिया संहित कुलक्षय केला. त्याप्रमाणें भाऊसाहेब ! तुह्मीं केलें." त्याजवर मल्हारराव होळकर यांणीं दृष्टांत दिला जे, "द्वापारयुगीं राजा दुर्योधन शत बंधूंसहित राज्य करीत असतां द्रौपदीमुळें सर्व राज्य लयास गेलें. ते काळीं व्यासांनीं व विदुरांनीं व श्रीकृष्ण परमात्मा यांनीं बहुत प्रकारें सांगितलें परंतु राजाचें ह्मणणें कीं, 'सुईच्या अग्रीं मृत्तिका देणार नाहीं' या हट्टामुळें मार्गशीर्ष वद्य ३० अमावास्या सायंकाळीं राजा दुर्योधन गदायुद्धांत पडून राज्य हरविलें. तसेंच भाऊ साहेब ! आपणास घडून आलें आतां अंत राहिला नाहीं. तुमच्या लष्कराची

खराबी इराणीस कळली. आतां सर्वस्वी बुडवितो. कालचक्रांत सर्व पडलों. उत्तम गोष्ट बनून न आली. पहिल्यानेंच सलूख संपादिला नाहीं. आतां इराणी तुह्मांस खातरेंत आणीत नाहींत. तुह्मी हेका केल्यामुळें दौलत सारी बुडली. या समयीं यासाठीं श्रीमंत राजश्री नानासाहेब असते तरी कसच्या गोष्टीचा हेका न करिते. तुम्ही प्राणानिशीं जातां. तुमचे चित्तांत असें येत असेल इराणीचा मजकूर किती ? मारून धुडकावून देऊं. हीं गोष्ट सांगतां खरी. परंतु तो प्रसंग आतां नाहीं. हा जीव तुमचे अन्नाचा या प्रसंगीं खर्च जहाला असतां चांगला, परंतु अगोदर अन्नावांचून डोळ्यापुढें आंधाऱ्या येतात. तेव्हां युद्धाची वार्ता कशी करावी ? आतां जीविताची तमा धरून रांडापोरें वांचतात असा अर्थ नाहीं. तुम्ही सर्वांचा घात केला. आपल्या हातें सर्व वैभव बुडविलें. आमच्या डोळ्या देखत आमचीं रांडापोरें गिलचा बाटवितो. तें दुःख प्रत्यक्ष दृष्टीनें पहावें. आपण आपला कुटुंबघात आपल्या देखत करून उद्यांच्या लढाईत आम्ही सर्व प्राणानिशीं गेल्यानें आपली स्वारी फत्ते होते कीं काय ? "

अशा प्रकारचीं सर्व समुदायाचीं उत्तरें जिकिरीचीं रायांनीं ऐकून घेऊन प्रतिउत्तर दिलें कीं, "होणारास उपाय काय ? कोणी आपण आपलें अनिष्ट चिंतीत नाहीं. दैवगतीनें घडून आल्यास उपाय कोणाचा ? यश किंवा अपयश महाराज छत्रपतींकडे. आतां शरीर तृणप्राय मानून, मर्दुमीचा हिम्मत न सोडितां, समशेरीची

शर्थ करून दाखवावी. कौरव पांडव सकल सेनेसहित कुरुक्षेत्रीं धारातीर्थीं सुस्नात झाले, तदनुरूप आपणही व्हावें. यापरता पराक्रम कोणता ? सर्व सत्ता श्रीकैलास- नाथाची ! त्याप्रमाणें घडून येतें. दूषणें लावितां तीं प्रमाणच. गेल्या गोष्टी पुढें येतात असें नाहीं. प्रस्तुत पुढची विचारणा चित्तांत आणून यश छत्रपतींचें सांभाळावें. हें यश तुह्मां समस्तांचें आहे ! निदान- समयसागरतारक पिनाकपाणि आहे, मग इराणींची तमा ती काय ? आतां भय धरल्यानें काय होतें ? श्रीसांवकृपेनें इराणीस मारून गर्दीस मिळवून देऊं. सत्कीर्ति करून मरावें या भूषणापरतें दुसरें काय आहे? उद्यां सर्वांनीं खंदकनार होऊन मारतां मारतां कटून मरावें. या भूषणापरतें दुसरें काय आहे ? " हा नि- श्चय सदाशिवपंतांनीं करून सर्वत्रांस विडे देऊन बोळविलें.

नंतर विश्वासराव साहेब व सदाशिवपंत पुरंदरे व महिपतराव चिटणीस व बाबा फडणीस यांचे चिरंजीव नाना फडणीस व अप्पाजी माधवराव व अंताजी माण- केश्वर व रामाजी अनंत दाभोळकर व समशेर बहादूर व सदाशिव अप्पाजी पागे, दिमत सुल्तानखां वगैरेंचें ममतेचें मंडळ एकांतीं घेऊन त्यांस विचारलें कीं, " समय तर तुटक व दुर्घट प्राप्त झाला. प्राणावर येऊन बेतली. होणार तेंच घडून येतें. चिरंजीव वि- श्वासराव साहेब, तीर्थस्वरूप नानासाहेबांचे व सौभाग्य- वती गोपिकाबाईंचे प्राणांचेही प्राण ! अगोदर विश्वा- सराव साहेब यांस आमचे बरोबर पाठवीत नव्हती. सौभाग्यवती गोपिकाबाई साहेबांनीं माझे मनोधारणास्तव

[ पाठविलें व ] विश्वासराव साहेब आमचे ममतेस्तव हेका करून स्वारीस आले आणि आतां तरी गोष्ट अनुचित बनून आली. विश्वासराव साहेब! तुमचें वय लहान. तुह्मी सुखाची जाति तिलप्राय अनुभवली नाहीं. तुम्हांसारखे सगुण पुत्र, उभयतांची ममता तुमचे ठायीं विशेष, असें असतां हें महत्तर अपेश श्रीमंतानें माझे विभागास आणिलें." असें बोलतांच भाऊसाहेबांच्या नेत्रांस पाणी आलें कीं, "रावसाहेब! तुम्हांस मीं मरणाचे वरीं आणिलें. ही गोष्ट सर्वोपरी आमचेपासून गेली!" ऐसीं भाषणें ऐकून सर्वांस गहिंवर आला. त्याजवर विश्वासरायांनीं उत्तर केलें कीं.

"माझे प्राणांविषयीं मजला तिळमात्र काळजी वाटत नाहीं. परंतु हा समय आपल्यावर गुजरला. मागें नानासाहेब तुह्मांवांचून घटकाभर प्राण ठेवणार नाहींत! आपण उभयतां बंधु, एक धर्मराज व एक अर्जुन, किंवा एक श्रीरामचंद्र किंवा एक भरत, याप्रमाणें पराक्रमी असतां हा प्रसंग घडून आल्यास श्रीमंत नानासाहेबांची काय गति होईल ती कळेना. तुह्मी उभयतां बंधु कायम असल्यास माझे सारिखे पुत्र बहुत होतील!" ऐशीं उदासपणाचीं भाषणें विश्वासरावाचीं राव भाऊंनीं श्रवण करून विश्वासरावांस आलिंगन देऊन बहुत श्रमी जहाले. भाऊसाहेब ह्मणूं लागले कीं, "आह्मीं तरी सतीचें वाण घेतलें, आतां तुह्मांस ईश्वर साह्य आहे." त्याजवर विश्वासरावांनीं उत्तर केलें कीं, "आपण वडील संनिध असतां मला भय काय? परंतु ईश्वरी इच्छेकरून ही गोष्ट बनून आली अ-

सतां दुसरा पराक्रम जन्मास येऊन कोणता करावा ? आतां प्रतिज्ञा हेच कीं. रूमशामची बादशाहत करून रूमशाम येथील सरदेशमुखीच्या वतनाचीं वस्त्रें श्रीछत्रपतींच्या नांवें घेऊन, आजपावेतों हक्काचा ऐवज राहिला आहे तो घेऊन ढाला माघाऱ्या देऊं ! नाहीं तरी जो प्राणी जन्मास आला त्यास तरी मृत्यु आहे. परंतु या कुरुक्षेत्रीं रणांगणाचेठायीं पराक्रम करून मृत्यु आलियास दुसरें काय पाहिजे ? याजकारितां मजविषयीं अणुमात्र चित्तांत कांहीं एक आणूं नये. जें ईश्वरानें नेमिलें असेल तें कदापि टळावयाचें नाहीं. मग खेद करावयाचें कारण कोणतें ? नानासाहेबांहून मला तुह्मी वडील अधिक ! त्यापेक्षां श्रमी होऊं नये." तेव्हां समस्त सैनिकांस निश्चयात्मक कळलें.

ते दिवशीं सदाशिवपंतांनीं व विश्वासराव यांणीं कडकडीत निश्चक्र केलें. उदकही घेतलें नाहीं. रात्रीचे ठायीं विश्वासराव साहेबांनीं व राव भाऊंनीं साखर, बतासे, फळफळावळ मात्र भक्षिली. तों मध्यरात्रीचा समय जहाला तीन प्रहरांचा समय होतांच उभयतांनीं निद्रा संपादिली. कांहीं निद्रा लागली न लागली एवढ्यांत जागृत होऊन, शौचविधि करून, मुखप्रक्षालन करून खिजमतगारास आज्ञा केली कीं, नकीबास बोलावणें करून हुकूम द्यावा कीं, लहान थोर सरदारांनीं तयार होऊन लढाईस चलावें या- प्रमाणें नकीबास ताकीद होतां क्षणींच ते संपूर्ण सैन्यांत फिरून, ताकीद करतांक्षणीं सर्व सरदार लहान थोर एकदील होऊन शिलेपोस सरंजामानिशीं तयार जहाले.

तदनंतर विश्वासराव साहेब व भाऊसाहेब या उभयतांनीं तैलाभ्यंग करून मंगलस्नानें केलीं. देवतार्चनें संपादून, फलाहार अल्प करून, पिकले पानांचे विडे घेऊन, जामदारखान्यांत जाऊन, रणांगणींचीं पीत वस्त्रें घेतलीं शिरपेंच व तुरे व चौकडे व बाजूबंद, व मोत्यांच्या कंठ्या व शस्त्रास्त्रें ठायीं ठायीं बांधून तरकसकमान हातीं घेऊन सज्ज झाले. नंतर निशाण बारदारांनी निशाणें घेऊन नगारा नौबतीं करून एकदांच गर्जना केली. तेव्हां भूमंडळ नादेंकरून तुंबळ जहालें. तेणेंकरून रणरंगवीरांस वीरश्रीचीं स्फुरणें आलीं. प्रातःकाळ होतांच दुसरा नगारा जहाला. तेव्हां तमाम सरदार तयार होऊन येऊन सदाशिवपंतांस मुजुरे करून आपापले घोडयावर स्वार जहाले. भाऊसाहेबांनीं मल्हारजी होळकर व जनकोजी शिंदे व दमाजी गाइकवाड यांस सन्निध बोलावून आणून सांगितलें कीं, " आजचा निदान समय, शंभर वर्षे पूर्ण भरलीं आणि आज सतीचें वाण घेतलें. त्यापरती दुसरी गोष्ट अणुमात्र चित्तांत आणूं नये. तुह्मी पुरातन कैलासवासी रावसाहेब व आपासाहेब यांचे वेळचे पदरपारी आहां. आजपर्यंत अन्न भक्षिलें त्याचें आज सार्थक करून दाखवावें. स्वर्गी रावसाहेब व आपासाहेब भले ह्मणतील, तें कर्म करावें! रायांनीं दौलतसुद्धां आह्मांस तुमच्या हवालीं करून कैलासभुवनास गेले. त्या गोष्टीची शरम तुह्मांस असावी. यश किंवा अपयश हें तुमचें तुह्मीं सांभाळावें ! " ह्मणून भाऊसाहेबांनीं सर्वांस पदर पसरून सांगितलें. तेव्हां होळकरादिक सरदार यांणीं

उत्तर दिलें कीं, " आह्मी जीवित्वाची तमा धरीत नाहीं ! महाराजांचें पुण्य आमचे मस्तकीं असतां इराणीची विशाद काय ? मारून गर्दीस मिळवून देऊं. आपण कांहीं चिंता न करावी." याप्रमाणें बोलून मुजरा करून आपआपल्या मिसळेस उभे राहिले.

पेशजी इराणीनें शुभ्र कुंजर भाऊसाहेबांस दिल्हा होता तो ऐरावततुल्य भयंकर, दुसरा शामसुंदर गज कज्जलप्राय शूरत्वांत आगळा रणरंगधीर, तिसरा गजाननबक्ष. हे तीन हत्ती शृंगारून आणून उभे केले. पंचरंगें करून चित्रविचित्र शुंडादंड मस्तकावर रेखिले व बादली पाखरा गजपृष्ठीवर घालून सुवर्णमंडित पिंपळवनें मुक्तलडाच्या झालरी व गळ्यांत रुप्याच्या घंटा, व रुप्याच्या वांकी, तोडर पायीं, रुप्या सोन्याच्या अंबाऱ्या हत्तींवर ठेवून चौफेर मोत्यांचे घोंस लाविले. ते मदोन्मत्त वारण विलोकितां केवळ सुरेश्वराचे ऐरावत भासले. रणरंगधीर गजावर सदाशिवपंत भाऊ आरूढ जहाले. व गजाननबक्षावर खांसे विश्वासराव साहेब स्वार जहाले. व शुभ्रवर्ण गजबक्षावर जरीपटका ठेविला. तिसरी नौबत करवून, भीमा ऐशी गर्जना करून खंदक पार जहाले. पुढें बाणांच्या खोंचेचे तफावतीनें उभे राहिले; व संपूर्ण सरदार लहान थोर भाऊसाहेबांजवळ येऊन फिरून मुजरे केले. सर्वांचे मुजरे घेऊन सेनासनेत उभे राहिले. भाऊसाहेबांनीं सारी सेना गोचर केली. तों फौज असंख्यात, नजर पुरेनाशी झाली. तेव्हां भाऊसाहेबांनीं मल्हारजी होळकर यांस विचारलें कीं, " कोणते तऱ्हेनें सैन्याचा विभू रचावा ?

शत्रू आपले कबजांत कोणते तऱ्हेनें आणावा ? एकदांच चालून घ्यावें किंवा तीन टोळ्या कराव्या ? कोणते टोळीस कोण नेमावा ? याचा विचार सांगावा." त्याजवर मल्हारजी होळकर यांनीं विनंति केली कीं, "फौजेच्या तीन टोळ्या कराव्या." डावे बाजूस विश्वासराव साहेब यांजकडे लोकांच्या नेमणुका जहाल्या.

तपशील मोठे मोठे नामांकित सरदार असामी.

| | |
|---|---|
| १. यशवंतराव पवार. | १. संताजी आटोळे. |
| १. जंगी समशेर. | १. जिवाजीपंत. |
| १. गोविंदराव निंबाळकर | १. गोविंदराव व्यंकटेश. |
| १. दत्ताजी वाघ. | १. संक्राजी वाघ. |
| १. बुवक्कर मंडळी. | १. फिरंगोजी पवार. |
| १. चिमणाजी माधवराव. | १. सोनजी भापकर. |
| १. व्यंकाजी मोहिते. | १ धीराजी पवार. |
| १. भगवंतराव रणदिवे. | १. बाबराव पाटणकर. |
| १. यमाजी बांडे. | १. मानसिंगराव मुळे. |
| १. मायाजी वाडगेकर. | १. चिमणाजी जनार्दन. |
| १. सदाशिव विष्णु. | १. चिमाजी मोहिते. |
| १. हसनखां. | १. फरदुल्लाखां. |
| १. रहिमानखां. | १. कमालखां. |
| १. चंदूखां. | १. पायदळ. |
| १. फुट पथके. | १. सफेजंग जमादार. |
| १. मीरबेग. | १. हसलखान. |
| १. बडेखां. | १. सुजातखां. |

३४ असामी.

सदर्हूप्रमाणें जहाल्या. यशवंतराव पवार पंचवीस हजार फौजेनिशीं केवळ महाभारतींचा वीर, नामांकित, जगत्प्रसिद्ध, ज्याच्या पराक्रमाचा लौकिक वडिलोवडिलीं सरकार चाकरी करून संपादितच आले. याप्रमाणें नामी नामी सरदार व धारकरी मिळोन एकंदर राऊत चाळीस हजार. शिवाय पायदळ, इभ्रामखां गाडदी यांजकडील प्रमुख सफेजंग जमादार व हसनखां व फरदुल्लाखां व चंदूखां वगैरे गार्दी लोक पंचवीस हजार खांसागज व फुट पतकें पांच हजार एकूण विश्वासराव साहेबांचे टोळीस फौज सत्तर हजार. दुसरी टोळी सदाशिवपंत भाऊ खांसे अंबारींत बसून [ अंबारीच्या ] खांबांस नवरत्नांचे फर्श बांधिले. कारण कीं, संपूर्ण वसुंधरेचें राज्य करीन किंवा इंद्रपदींचें घेईन ! अंबारींत बसतांच शरीर लाल झालें व नेत्रही आरक्त झाले. त्या समयीं भाऊ कसा भासला कीं, केवळ कल्पांतीचा आदित्य. याप्रमाणें भयानक दिसूं लागला. त्या वेळेस कोणाच्यानें पहावेनासें झालें. हा केवळ कलियुगीं कर्ण जन्मला यांत संदेह नाहीं. सभोंनीं फौज ६० हजारांचा गलोल घेऊन मध्यभागीं इराणीसमूर परम आवेशें उभे राहिले. तिसरी टोळी तपशीलवार असामी बितपशील:—

| | |
|---|---|
| १. जनकोजी शिंदे. | १. समशेर बहादूर. |
| १. दमाजी गाइकवाड. | १. किरकोळ पतके. |
| २ | २ |

४

सदर्हूप्रमाणें जनकोजी शिंदे व दमाजी गाइकवाड व समशेर बहादूर वगैरे किरकोळ पतके मिळोन साठ सत्तर हजार घोडेस्वार, याप्रमाणें जमाव करून उभे राहिले. याप्रमाणें तीन टोळ्या करून निशाणें सोडून, जुमस न खातां, उभे राहिले. श्रीमंत भाऊसाहेबांची स्त्री सौभाग्यवती पार्वतीबाई साहेब व इतर सरदारांचे कबिले व बुणगे बाजार यांचे संरक्षणास मल्हारराव होळकर दहा हजार फौजेनिशीं मागें ठेविले.

हें पाहून इराणी दुराणी व दिल्लीपद बादशहाकडील, व सुजातदौले व मनसूर अल्ली यांणीं आपले गोठ सोडून, फौजेचा पुस्तपन्हा राखून, त्यांनींही तीन टोळ्या करून, लढाई-प्रसंगास खांसा इराणी मध्यभागीं सत्तर हजार फौजेनिशीं व डावेकडे मनसूर अल्ली चाळीस हजार फौजेनिशीं व उजवेकडे सुजातदौले व हस्तनापुरवासी इसाफतखां, येणेंप्रमाणें दीड लक्ष फौजेनिशीं उभे राहिले. खांसा अबदल्ली पन्नास हजार फौजेनिशीं मागें गोठांत राहिला. दोघे पुत्र मात्र पुढें आले होते त्यांचीं नांवें, एकाचें नांव तेजूरशहा व दुसऱ्याचें नांव नजीमखां. यांजवळ रोहिले यांची खासी खासी जमेत एकदिलाची होती. त्यांतून तेजूरशहा यांनीं पन्नास हजार फौजेनिशीं दिन् ! दिन् ! ह्मणून नीट चालून घेतलें.

तेव्हां युद्धास तोंड लागलें, दारुण संग्राम झाला. हवद्यांस हवदे, राउतांस राऊत, एक मेळ जहाला. व सुतरनाले, बाणाच्या कैच्या व करोलाच्या गोळ्या व गरनाला व तोफांचा मार एकदांच जहाला. एकच

रणधुमाळी दोन्ही सैन्यांत माजली. धुरेंकरून दिनमणी-
चा अस्त झाला असा भास पडला. घे घे हीच
गर्जना उठली. उमास व्यावयास अवकाश पडेना.
पुढचा पाय पुढें. कोणास कोणी हरेना. एका परीस
एक आगळे. इराणीची जात अरबुज, आपपर म्हणा-
वयाची नाहीं. महाबली, महापराक्रमी, मोगल,
पठाण व रोहिले, रांगडे व रजपूत व पंजाबी, बिलंदे,
माळवी व काठेवाडी वगैरे नाना जातींचे त्यांनी संग्रा-
माची सीमा केली. बहुत मराठे दळ खपले. रक्तोद-
काचे पाट रणभूमीस वाहूं लागले. बिभित्स शरीरें
दिसों लागलीं. देहाभिमान कोणांत उरला नाहीं.
चौफेर लढाईची बेहद्द होऊन गेली. थोर थोर अमि-
रांचे हौदे खालीं जहाले. इराणी हांवभरी होऊन
फिरून नीट फौजेंत चालून घेतलें. तेव्हां मराठी फौज
कच खाऊन माघारीं सरली.

तें पहातांच भाऊसाहेबांनीं फौजेसुद्धां आपला अं-
बारीचा हत्ती फौजेंत लोटला. तेव्हां डावी टोळी वि-
श्वासराव साहेबांची होती, ती बेजरब उठली.
उजवेकडून जनकोजी शिंदे कमरग्यांत शिरून मोठी
मारामार झाली. शरसंधान अगदींच राहिलें. निमचे
व समशेरा चालूं लागल्या. तीन चार तासपर्यंत
एकच घाई शस्त्रसंधानाची झाली. मुर्द्यावर मुर्दे पडूं
लागले. वीरांच्या नजरा फिरून गेल्या. आपपर
कोणी ओळखेनासे जहाले. वीर रणामध्यें माजले.
रणमद चढला खांशा खांशांचे हौदे एकास एक
लागून जोरावारीनें लढों लागले. केवळ दशाश्री रा-

ताशीं मारूं लागले. ते समयां सदाशिवपंत [ यांणीं ] अंबारींतून उतरून, दोहों हातां पटे घेऊन, मोट फौजेंत चालून घेतलें. तेव्हां नामी नामी सरदार व धारकरी नांवा निनांवाचे यांणीं जीविताची तमा न धरितां बेत्राशक हैदानच केला. कोणास क्षतें वर्मी लागलीं, ते विष्णुलोकास गेले. व कोणी रणांगणीं मूर्छित पडले. व कोणाचीं शिरें तुटोन धडावेगळीं झालीं. व कोणाचीं उदरें फुटोन अंतरमाळा लोंबूं लागल्या. परंतु अणुमात्र कोणीं लढाईविषयीं कसर केली नाहीं. एकच गर्दी होऊन गेली. खासे विश्वासराव साहेब अगदींच गर्दीत गर्द होऊन गेले. तेव्हां सदाशिवपंत पाय उतारा होते ते घोड्यावर स्वार होऊन सैन्यांत मिसळले. मोठी तरवार करून विश्वासराव साहेब अंबारीसुद्धां संभाळून माघारे आपले जमातीत पाठविले. परंतु कायम आहेत किंवा वैकुंठवासी जाहाले हें वर्तमान पुरतेपणें लागलें नाहीं. आपण तसेंच पुढें चालून गेले. तेथें नामी नामी लोक दोन हजार ठार पडले. इराणीनें नामोहरम होऊन पाठ दिली.

त्या युद्धांत इकडील व तिकडील एकंदर चाळीस हजार लोक कामास आले. शिवाय केवळ जखमी लोक दहा हजार. याप्रमाणें युद्ध झालें. या मागें या कलियुगीं असा योद्धा कोणी झाला नाहीं. पुढेंही होणें जरूर. भारती युद्धासमान सदाशिवपंतांनीं युद्ध केलें. या कलियुगीं मानवकुळींत ब्राह्मणकुळांत जन्म घेऊन पराक्रम थोर केला. धन्य त्यांची जननी कीं,

असा पुत्र प्रसवली ! येणेंकरून सप्त पुरुष उद्धरून विष्णुलोकास गेले. धन्य त्या पुरुषाचा पिता ! त्यास साम्यता दशरथाची, किंवा पंडूची ! चिमाजी अप्पाची धन्य कीं, हा पुत्र रामाप्रमाणें निर्माण झाला. हें युद्ध पाहून स्वर्गीं इंद्र व देवगण व गंधर्व स्तुति करूं लागले कीं, मानवी होऊन, जातीचा विप्र असतां, प्रताप कर्णा-प्रमाणें केला ! ! केवळ राम रावण यांच्या युद्धा-समान युद्ध झालें. इराणीकडील लोक तीस सहस्र कामास आले व आठ हजार जखमा झाले. शिवाय घोडीं वीस हजार, उंटें सातशें व हत्ती दोनशें, येणें-प्रमाणें अमित्राकडील तळावर राहिले. भाऊसाहेबांक-डील नामी सरदार व धारकरी, एकाण्डे हुजरातीचे लोक वीस हजार ठार पडले. शिवाय उंटें पांचशें व घोडे पंधरा हजार व हत्ती नग सत्त्यारशें. ऐसा सं-ग्राम जहाला. मुख्य अबदल्लीचा पुत्र तेजूरशहा बहादर व नजीमखां वगैरे मातवर पठाण व रोहिले हक्क होऊन गेले. खांसे सुजातदौले यास चार जखमा झाल्या. इराणीचे फौजेनें शिकस्त खाऊन माघारी फिरली. अवसान अगदीं खत्ता झालें भाऊंनीं सेनासहित पि-च्छा पुरविला आणि इराणीच्या गोटांत फौज नेऊन घातली. एकीकडे पठाणांची टोळी होती ती नेस्त नाबूद केली. सदाशिवराव भाऊ अभिनव यश पावले. आनंदसागरास पारावार नाहीं शत्रु पराभवातें पावून, भाऊसाहेब व विश्वासराव साहेब उभयतां आपआपल्या अंबारींत बसून, महागर्जना करून रणतुरे व नौबती आणखी जयवाद्य वाजवीत आपले गोटांत चालले.

एकाच सिंहनाद झाला. त्यांची फौज शिकस्त खाऊन मागें गेली. त्या संधींत मागें अबदअल्ली पन्नास हजार फौजेनिशीं आपले गोटांत तयारच होता. त्याचे पुत्र उभयतां लढाईंत हक्क जहाले, त्यांचें वर्तमान श्रवण करून बाईटपणाचें ऐकतांच अबदल्ली यानें फौजेसहवर्तमान या अल्ला ! या खुदा ! या रहिमान ! याप्रमाणें देवाचा धांवा करून, जीवित्वाचा संकल्प सोडून, एकदांच वाद्यें वाजवून फिरून सदाशिवपंतांवर चाल केली. तेव्हां भाऊसाहेब यश संपादून आपले गोटांत जात होते. इतक्यांत शत्रु पाठीवर आला, हें वर्तमान कळतांच महातास सांगून खाशांचे हत्ती माघारे फिरविले. तें संपूर्ण फौजेनें पाहून सर्व लढाईच्या प्रसंगीं नीट चालले. लढाई सुरू होतांच विश्वासराव साहेब अंबारींतून तिरंदाजी करीत होते, इतक्यांत कोणीं दुष्टानें बंदुकीची जोडगोळी घातली. ती हृदयापार होतांच विश्वासराव साहेब लागलेच वैकुंठवासी झाले. तेव्हां त्या महातानें व जो खवासखान्यांत चौरीबारदार होता त्यानें कमरेचा दुपेटा काढून, विश्वासराव साहेबांस अंबारीचे खांबाशीं दृढ बांधून बसलेचे बसले तीर कमाणीसुद्धां तसेच ठेविले, पुढें लढाई होतच होती. या आकांताचें वर्तमान उजवे बाजूस भाऊसाहेब होते त्यांस विदित झालें.

नंतर भाऊसाहेबांनीं आपला अंबारीचा हत्ती खालीं बसवून, विश्वासराव साहेब यांचे हत्तीजवळ जाऊन तो हत्ती बसवून, रायाचें शरीर छिन्नभिन्न झालें होतें तें दृष्टीनें पाहून परम दुःख झालें. तें पत्रीं लिहिणाराची कल्पना कुंठित झाली. श्रीराम अयोध्यापूर सोडून

बनवासास जावयास सिद्ध झाले, तें वर्तमान ऐकतांच दशरथानें कैकयीच्या मंदिरांतच अंतर्धान केलें, तसेंच भाऊसाहेबांस जहालें. तेव्हां मल्हारजी होळकर यांस आज्ञा जहाली कीं, "तुह्मीं पुण्यास जावें. बराबर आमचें कुटुंब व इतरांचे कबिले घेऊन जाऊन, श्रीमंत नानासाहेबांस व श्रीमंत सौभाग्यवती गोपिकाबाईसाहेब यांस माझे साष्टांग नमस्कार सांगून विज्ञापना माझे तर्फेनें करावी. तुमचे चिरंजीव विश्वासरावसाहेब व भाऊसाहेब तीन लक्ष सेनेसहित इंद्रलोकीं सुखरूप आहेत. कांहीं चिंता न करावी उभयतां वडिलांनीं आजपासून लोभ चिरंजीव माधवरावसाहेबांवर करीत जावा. पुढें कांहीं दिवसांनीं त्यांचे हातून संपूर्ण शत्रु लयास जाणार. मी परशुराम अवतार आणि चिरंजीव माधवरावसाहेब केवळ अर्जुनाचा अवतार. आमचा संकल्प यांचे पराक्रमानें परिपूर्ण होणार. याप्रमाणें सांगितलेलें वर्तमान नानासाहेबांस व सौभाग्यवती वहिनीबाईस श्रुत करावें. कदाचित् शत्रूंनीं तुमचा पिच्छा पुरविला असतां आमच्या कुटुंबाचा शिरच्छेद तुह्मीं आपले हातीं करावा, परंतु शत्रूंचे हातीं जीवंत लागूं देऊं नये." तसेंच जनकोजी शिंदे यांस सदहू अन्वयें निरोपण जहालें. शिंदे मजकूर यांणीं उत्तर केलें कीं, "मी पुण्यास माघारा जावयाचा नाहीं. खावंद जर माघारे पुण्यास येतील तर मी जाईन. नाहीं तर जेथें खावंदाचा जोडा पडेल तेथें माझें शिरकमल पडेल ! यांत तिलमात्र अंतर नाहीं." तें ऐकून समागमें स्वारीबरोबर गंगोदकाच्या कुप्या चालत होत्या त्या सदाशिवपंतभाऊंनीं आणवून, खालीं

गाशा घालून शेलापागोटें, जामानिमा, ढालतलवार, सुद्धां सचैल स्नान करून, एको कुपीचें उदक प्राशन केलें आणि उत्तर केलें कीं, " आमचें पारणें जहालें!" मग मल्हारराव होळकर यांस रामराराम करून, "आतां लोभ असो द्यावा," असें बोलोन हयपान घोडा अर्बी होता. तो आणवून, वर स्वार जहाले. एवढ्यांत होळकर वगैरे यांणीं विनंति केली कीं, " एवढे हट्टास पडावयाचें कारण नाहीं. आपण उज्जनीस सालमजकुरीं छावण्या कराव्या. पेस्तरसालीं शत्रु आपण पहातच आहों. पुण्यास जावयाची खावंदास शरम वाटेल तर अलीकडे गंगा अथवा नर्मदा अथवा क्षिप्रा एवढ्या स्थळीं मुक्काम वर्ष सहा महिने करून, सर्व सरदार, घोडे, हत्ती व उंट व तट्टें, पायदळ, व तोफखाना यांचे बैल व अवांतर सेना खाऊन पिऊन हुशार होऊन पेस्तरसालीं रूमशामची खबर घेऊं! हिंदूचे मुसलमान होऊं; परंतु छत्रपतीचें नांव राखूं, यांत अंतर नाहीं!! आणि आपण कांहीं पदरचे सरदार यांचें ऐकून जावें. कारण पेशजी साष्टी, वसई कैलासवासी चिमाजी आप्पा यांणीं फत्ते केली आणि प्रतिज्ञा मोठीच केली होती; परंतु चौघां सरदारांचे मतें कोणतीही एखादी गोष्ट शेवटास नेत. तसेंच आपण वर्तावें." तेव्हां भाऊसाहेबांनीं उत्तर केलें कीं, " चिरंजीव विश्वासरावसाहेब गोळी लागून कामास आले. आतां आपण मोठा पराक्रम जरी करून पुण्यास गेलों तरी सौभाग्यवती गोपिकाबाईसाहेब माझें मुखावलोकन करणार नाहींत. कारण त्यांचे केवळ

जिवाचेजीव विश्वासरावसाहेब ते लढाईंत पडले असतां त्या वडिलांचे भेटीस आपण जावें हें अयोग्य."

एवढ्या संधींत मल्का जमानीन बिबीसाहेब, दिल्लीश्वराची बादशहा जादी, हिणें जी फौज रूमशामचे बादशाहाकडून कुमकेस इराणी व दुराणी, जिलचे नादिरशाह व तैमूरशाह वगैरे आली होती त्यांस पदर पसरला कीं, "तुह्मी जर लढाईस कमकसर केली तर दिल्लीचे बादशाह फकीर होऊन देशांतरास जातात. हें समजून एक वेळ आणखी लढाई रणखंदल करावी. त्यांत खुदानें यश दिल्यास पुनः दिल्लीस जाऊं. नाहीं तरि दिल्ली सोडून परागंदा होऊं. तुमचे लष्करासन्निध उतरलों आहों. मुसलमानी बादशाहीची शरम ठेऊन बेजरब लढाईस भिडावें. बारग्यांची फौज दरवर्षी येऊन बादशहास इजा देऊन, घासदाण्याचे ऐवजीं खंडण्या घेतात, आणि रात्रंदिवस बादशहा दिलगीर होतात, हें दुःख सोसवत नाहीं. आपण बादशाहत करूं अथवा बारगे करतील हाच संकल्प!" तेव्हां सरदारांनीं तसलिमात करून, बिबीसाहेबांचा हुकूम घेऊन, एकदांच घोड्याच्या अनीना उठवून मोहल्लांच्या माशा उठतात त्याप्रमाणें सर्वत्रांनीं उडी घातली. तोफा व बंदुका आणि बाणांच्या कैच्या व गरनाला आदिकरून भगर्दीच राहिल्या तरवार चालती जहाली.

तेव्हां राव भाऊंनीं त्या रोहिल्यांप्रमाणेंच उडी तली. पहिल्या लढाईच्या वेळेस सव्वा चार लक्ष न गणतास लागली होती. त्या आलीकडेस सर्व सैं- लढायांत खपून तीस सहस्र घोडा स्वार शिल्लक

राहिला. त्यामुळें भाऊसाहेबांनीं उडी घातली. तेव्हां केवळ कल्पांतींचा आदित्य भासला. ग्रीष्मऋतूच्या दिवसांत मेघाचे ढग उठतात आणि विद्युल्लता चमकून लागलीच नाहींशी होते, त्याप्रमाणें भाऊसाहेबांनीं संग्रमांत उडी घातली तेसमयीं सर्वांस दिसले. तिकडील खांना अबदल्ली व मनसूरअल्ली व सुजातदौले, इराणीकडील नादरशाह, तबूरशाह वगैरे उरल्या फौजेसहित त्यांणींही उडी घातली. तेसमयीं श्रीहरि त्या अमित्राकडील फौजेस सन्मुख जाहला. श्रीमंत पेशवे बहादूर यांस विन्मुख झाला. याजमुळें सर्व नाश जाहला.

हत्ती घोड्यांनीं व उंट तट्टांनीं संपूर्ण खंदक भरला. खंदक भरल्यावर जे लोक भिकारी होऊन अन्न अन्न करीत दुसरा वेष धरून पुण्यास आले ते आले. कितीकांचे तोतये जहाले. हजारों हजार त्या कुरुक्षेत्रीं रणमंचकीं निजलेच राहिले. पुढें असा संग्राम होणें कठीण आणि अशा पुण्यभूमीस मरणही येणें कठीण. त्यांत धारातीर्थ, भाऊसाहेब केवळ परशुराम अवतार, लढाईची या मृत्युलोकीं कीर्ति करून, मोठमोठ्या शत्रूंचीं पारिपत्यें करून, मरण काळपर्यंत नानासाहेबांची आज्ञा न उल्लंघितां, दराराकिबीस तरवार फत्ते करून, जन्मप्रभृति जय संपादून शके १६८२ विक्रमनामसंवत्सरीं मंगळवारीं पौष शुद्ध २ अवतार संपविला. ते दिवशीं मागील चारघटिका दिवसास सूर्य असतांच अंधःकार पडला. रण रात्रीस हा कालपर्यंत घुमत असतें.

तें तहकीक वर्तमान एक बारनिसानीं डाकेबरोबर

पुण्यास नानासाहेबांस लिहून पाठविलें. वर्तमान नानासाहेबांनीं श्रवण करून भाऊसाहेबांची बहुत खंती करूं लागले. रात्रंदिवस जेवितां व स्नानसंध्येंत व कारभाराचे कचेरींत, व झोंपेंत भाऊ ! भाऊ ! ह्मणून उचकून उठूं लागले. केवळ भाऊसाहेबांचें वेड लागलें. " हाय! हाय ! भाऊ ! माझे दृष्टीस केव्हां पडशील ? केव्हां भेटशील ? माझा पुत्र विश्वासराव गेला. त्याचें मला फारसें स्मरणही होत नाहीं. परंतु भाऊसाहेबांनीं मला मागें टाकून आपण स्वर्गवास केला. माझे अंधळ्याची काठी चोरून नेली ! माझे धनाचा चरू कोणीं चोरून नेला तो कळेना ! ! आतां प्रपंचांत राहून कांहीं एक नफा नाहीं. आतां देहत्याग करावा अथवा संन्यास घ्यावा अथवा वैराग्य घेऊन जिकडे भाऊसाहेब गेले तिकडे जावें. हा हेतु यापरता दुसरा विचार नाहीं. असा शोक जहाला. "

तदनंतर सर्व कारभारी यांणीं परोपरी विज्ञापना केली. तथापि नानासाहेब शोकार्णवीं पडोन भ्रांत जहाले. अन्न, पाणी, तांबुल, विलास, नृत्य, कारभार व कोणत्याही गुणेंकरून व कोणत्याही विषयेंकरून मर्जी शांत होईना. सबब पुणें मुक्कामींहून दुसरी फौज पुणें संस्थानची होती ती सिद्ध करून, भाऊसाहेबांचें उसनें घ्यावें या कारणास्तव हिंदुस्थान प्रांतीं मोहिमेस चालले. कोण्या कारभाऱ्यांचें पुढें चालेना. रामचंद्रासाठीं भरतानें अयोध्यापूर सोडून नंदिग्रामीं राहून वैराग्यवान, उदास जाहले; तद्वत राव नानांनीं आरंभिलें. मजल दर मजल करीत चालले. खेचेवाडेपर्यंत गेले.

तेव्हां कोणे एके दिवशीं रात्रौ भोजन करून मजलसीस बसले असतां रायास भाऊसाहेबांचें स्मरण जहालें. तेव्हां गहिवर येऊन अश्रुपात करूं लागले. इतक्या समयांत कोणी कलावंतिणी नृत्य करावयास आल्या. त्यांनीं उत्तम प्रकारचें गायन करून रायाची मर्जी सुप्रसन्न केली. तेव्हां साहेबांनीं ह्मटलें कीं, "जी इच्छा असेल ती आज मागावी, मी देईन." अशी आज्ञा जहाली. तेव्हां त्या कलावंतिणीनें पुढें पदर पसरून अर्ज केला कीं, "आपण दक्षिणचे ब्राह्मण बादशाह, ज्या ठिकाणीं भाऊसाहेब गेले आणि गर्क जहाले तें ठिकाण आपण दृष्टीनें पाहूं नये, व खावंदांनीं मोहिमेस स्वतां जाऊं नये. दुसरे सरदार पाठवून शत्रूचीं पारिपत्यें करावीं. हेंच आह्मांस बक्षीस द्यावें. आणखी कोणे गोष्टीची इच्छा नाहीं. सर्व कांहीं खावंदाचे चरणप्रसादेंकरून आह्मांस घरीं अनुकूळ आहे." त्यासमयीं पुरंदरे वगैरे ब्राह्मणमंडळी कारभारी व मराठे व मुसलमान सरदार यांणीं रायास विनंती केली कीं, 'महाराजांनीं इच्छा असेल तें मागावें, मी देतों, असें वचन दिलें; त्यापेक्षां हें बक्षीस त्या कलावंतिणीस देणें प्राप्त, अशी मागास गोष्ट आली. याजवर धनी समर्थ आहेत." याप्रमाणें सर्वांचीं भाषणें रायांनीं श्रवण करून माघारा डाला फिरविल्या.

फिरून स्वारी पुण्यास येऊन विक्षिप्त भाऊसाहेबांचे वियोगें करूनच जहाले. काम कारभार कार्याकारण होऊं लागले. गादीवर बसणें त्याचाही त्याग केला

दिवसेंदिवस शरीर कृश झालें. इहिदे सितैनांत ज्येष्ठ-मासीं नानासाहेबांनीं कैलासवास केला.

भाऊसाहेब व जनकोजी शिंदे, यशवंतराव पवार व आपाजी जाधवराव व बापूजी बल्लाळ फडके वगैरे मंडळीचें ठिकाण लागलेंच नाहीं! विश्वासराव साहेब यांचा हत्ती प्रेतासुद्धां शत्रूंनीं वळवून नेला. आणि विश्वासराव साहेब यांचें स्वरूप गिलचे अबदल्ली व मनसूर अल्ली आणि सुजातदौले व इराणीकडील सरदारांनीं पाहून बहुत श्रम पावले, आणि ह्मणूं लागले कीं, " असल्या मोहऱ्यास कोणीं गोळी घालून मारिला? जिवंत अंबारीसुद्धां धरून आणावयाचा होता. तुह्मी मारिला हें ठीक केलें नाहीं " असें ह्मणून सर्वांनीं धरणीवर शरीरें टाकून हाय हाय! करूं लागले. कोणी आपल्या पदरानें अशुद्ध पुसूं लागले. कोणीं मुखाशीं मुख लावूं लागले. तेव्हां शत्रूकडील सरदारांनीं तसलीनात केली कीं, " त्याजकडील लष्करांतून गोळी लागली आणि हक्क जहाले. याचा दोष आमचेकडे नाहीं. " मग अबदल्ली वगैरे यांणीं कबर बांधावयास हुकून दिला. तेव्हां अनुपगीर गोसावी, चरणगीर गोसावी वगैरे रजपूत व रांगडे यांणीं अबदलीस अर्ज केला कीं, " आमचा हिंदूचा मुर्दा, त्यांत पेशवे बहादूर यांतील खास धनी, यांचें दहन किंवा छत्री काय करणें ती आह्मी करूं. मुसलमानास एकंदर करूं देणार नाहीं. याविषयीं आह्मी सर्व हिंदु लढाईस मजबूत आहों, यांत अंतर नाहीं " असीं प्रत्युत्तरें गोसावी यांचीं वगैरे अबदल्ली व दिल्लीच

बादशहा वगैरे यांनीं ऐकून प्रेत त्यांचे हवालीं केलें.

पुरुषांत देखणा विश्वासराव साहेब किंवा बायकांत देखणी मस्तानीबाई साहेब, समशेर बहादूर यांची मातोश्री, अशीं दोन माणसें दक्षिणेंत स्वरूपानें जहालीं. श्री० नानासाहेब अंशधारी पुरुष, त्यांत शाहू महाराज छत्रपति यांचा वरदहस्त मस्तकीं, तेणेंकरून सर्व पेशव्यांचे वंशांतील पुरुष जय संपादितच आले. शेलके घोडे, व शेलके माणूस, व शेलके हत्ती, शेलक्या सांडणी आठ कोश नित्य चालणार व शेलकें जवाहीर व शेलकी तरवार व शेलक्या तोफा वगैरे शेलकें साहित्य सोनपत पानपत कुंजपूर व दिल्ली वगैरे ठिकाणीं सर्वस्व बुडालें. कितीकांचीं घरें बसलीं. कितीकांच्या नक्कला झाल्या. कितीक पुरुष शिपाईगिरीचे अहंकारी ते बद्रिकाश्रमास वगैरे पवित्र जागीं तपस्वी तपश्चर्येस गेले. कितीक हातापायांनीं अ[illegible] जहाले. आणि भाऊबंद लढाईंत गर्क झाले, आणि देशीं काय जा[illegible], या कारणास्तव गंगाप्रवाहीं व यमुना प्रवाहीं कितीकांनीं घालून घेतलें. कितीकांनीं राज्यलोभें प्रयागीं जाऊन करवत घेतले. कितीक आभ[illegible] जहाले. कितीक दरिद्री जहाले. तें पत्रीं कोठवर लिहावें.

एक वाकनिस शत्रूकडील व श्रीमंताकडील या उभयतांच्या दिनचर्येचें वर्तमान दफात्यास चिटणीसांनीं बार केली. त्यांची संगत पाहून, कच्चा मजकूर सेवेशीं निवेदन करावयाकरितां यथामतीनें बखर सजवून सेवेशीं पाठविली आहे. शके १६८४ चित्रभानुनाम संवत्सरे फाल्गुन शुद्ध ९ मंदवासर मुक्काम पुणें. मागून